भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या.केडगाव

| मुदत ठेव | व्याजदर |
|---|---|
| ३० दिवसाकरिता | ८ % |
| ४६ दिवस ते ९० दिवस | ९ % |
| ९१ दिवस ते ३६५ दिवस | १० % |
| १२ महिने ते १७ महिने | १०.५० % |
| १८ महिन्याच्या पुढे | ११ % |
| मासिक ठेव (संचित मुदत ठेव) | ८% |
| दैनंदिन ठेव (बिंदुसागर ठेव) | २.५०% |
| व्यक्तीगत सेव्हिंग्ज ठेव (द.सा.द.शे) | ५% |

आपल्या विश्वासाची भैरवनाथ पतसंस्था केडगाव, नगरकरांच्या सेवेत घेऊन येत आहे

सुवर्ण कर्ज व ठेव योजना

सर्व ठेवी ज्येष्ठ नागरिक ०.५०% (अर्धा टक्का व्याज) जादा

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

आला आला पाऊस आला..

रेनकोट / 2 in1जर्किन

लहान मुलांपासून सर्वांसाठी

Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!

आता पुण्यात सुद्धा..

जरीवाला

कापड बाजार, फोन नं. 7666510765

यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.

सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ६ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २५.११.२०२४ | अंक नं. २२३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा

बस्ता बांधायला यायचं हं!

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा

राजपाल™

संगमनेर (02425) 222226

अ. नगर (0241) 2999299

नारायणगाव (02132) 242132

श्रीरामपूर (02422) 220090

## बाजारपेठेतून भरदिवसा दागिने व रोकडची चोरी

नगर - बाजारपेठेत गर्दीचा फायदा घेत महिलेच्या पर्स मधून सोन्याचे दागिने व रोकड अज्ञात चोरट्याने चोरल्याची घटना शनिवारी (दि.२३) दुपारी १२.५० ते १.१० या कालावधीत घडली आहे. या प्रकरणी रविवारी (दि.२४) दुपारी कोतवाली पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मीना साहेबराव भवर (रा.निंबळक, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या शनिवारी (दि.२३) दुपारी बाजारपेठेत खरेदीसाठी आल्या होत्या. त्या बाजारपेठेत फिरत असताना कापड बाजार परिसरात दुर्गासिंग लस्सी दुकान ते शहाजी रोड दरम्यान गर्दीमध्ये त्यांच्या जवळील पर्समधून अज्ञात चोरट्याने सोन्याचे कानातील वेल, झुमके व रोख रक्कम असा २६ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला असल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. घरी गेल्यानंतर ऐवज चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी रविवारी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## मार्केटयार्ड परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर - मार्केटयार्ड परिसरात भाडोत्री रूममध्ये राहत असलेल्या अल्पवयीन मुलीला (वय १७) अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले. शुक्रवारी (दि.२२) सायंकाळी पाच वाजेच्यापूर्वी ही घटना घडली. या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुध्द अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी श्रीगोंदा तालुक्यातील एका गावात राहतात. त्यांची मुलगी नगरमधील मार्केटयार्ड परिसरातील भाडोत्री रूममध्ये राहत होती. तिला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळून नेले. सदरची घटना फिर्यादीला समजताच त्यांनी नगर गाठले. मुलीचा सर्वत्र शोध घेतला असता ती मिळून आली नाही. त्यांनी दुसऱ्या दिवशी शनिवारी (दि.२३) रात्री कोतवाली पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला असून तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक योगिता कोकाटे करत आहेत.



एमआयडीसीतील वखार महामंडळालगत रस्त्याच्या बाजूने पडलेली घाण. (छाया- बबलू शेख)

## मतमोजणीचे ठिकाण असलेल्या वखार महामंडळाचे गोदाम अडकले घाणीच्या विळख्यात

नगर - अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी शनिवारी (दि. २३) पार पडली. ही मतमोजणी ज्या ठिकाणी होती ते एमआयडीसीतील वखार महामंडळाचे गोदाम घाणीच्या विळख्यात सापडले आहे. गोदामाच्या भिंतीलगत रस्त्याच्या बाजूला मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. या घाणीमुळे परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरली असून, माशांचे मोहोळ तयार झाले आहे. या ठिकाणी मतमोजणीसाठी आलेल्या अधिकारी, कर्मचारी आणि पोलिसांना तब्बल दहा तास नाकाला रुमाल बांधून राहावे लागले आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपली 'ड्यूटी' पूर्ण केली. मात्र येथे आलेल्या कार्यकर्त्यांनी या अस्वच्छतेबाबत तीव्र संताप व्यक्त केला.

एमआयडीसीतील वखार महामंडळाच्या गोदामाचा मागील काही वर्षापासून निवडणूक मतदान यंत्रे ठेवण्यासाठी, मतमोजणीसाठी वापर केला जातो. यावेळीही शहर मतदारसंघाची मतमोजणी याच ठिकाणी करण्यात आली. मात्र सदरचे गोदाम घाणीच्या विखळ्यात सापडले आहे. गोदामासमोरच रस्त्याच्या बाजूने कचऱ्याचा ढिगारा लागला आहे. या ढिगाऱ्यावर मृत झालेली जनावरे, मांसाचे तुकडे, कातडे यासह प्लॅस्टीक, कागद कचरा मोठ्या प्रमाणात पडलेला आहे. या घाणीमुळे परिसरात उग्र दुर्गंधी पसरली आहे. या घाणीवर मोठ्या प्रमाणात माशा घोंगावत असून, येथून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना ओकारी येईल अशी गलिच्छ घाण येथे पडलेली आहे. मतमोजणीसाठी आणि त्यापूर्वी स्टॉंगरुमच्या बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिस आणि कर्मचाऱ्यांना अक्षरशः नरकयातना सहन कराव्या लागल्या. या घाणीमुळे परिसरात डासांची मोठ्या प्रमाणात उत्पत्ती झाली आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरात प्रवेश करणाऱ्या एका मुख्य रस्त्यावरच एवढी मोठी घाण पडलेली असल्याने शहरात कशी स्वच्छता असेल असा कयास बाहेरून येणारे नागरिक करत आहेत.

प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निवडणुकीनंतर मतमोजणीपर्यंत अनेकदा या गोदामाला भेट दिली असेल, परंतु कोणत्याही अधिकाऱ्याने परिसर स्वच्छतेचे आदेश न देता स्वतःच्या नाकाला रुमाल लावणे पसंत केल्याने स्वच्छतेबाबत अधिकाऱ्यांची मानसिकता अधोरेखित होत आहे.




SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES

Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite

सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## सलाम विक्रमी मतदान करणाऱ्या नागरिकांना

आरोप प्रत्यारोप, नैतिकतेचा ऱ्हास होत चाललेले काही बडबोले, कोण कुणाकडून हे कळण्यापर्यंत पक्ष व विचार, बदल, अगतिक जनता या सर्व गदारोळात एकदाची विधानसभा निवडणूक पार पडली. मतदारांनी न भूतो न भविष्यते निकाल देऊन एकप्रकारे भविष्याची जणू नांदीच दिली आहे.

मागील ५ वर्षात राज्याने अनेक विचित्र घटना पाहिल्या आणि या सर्व घटनांनी महाराष्ट्र कुठे चाललाय याची भिती, काळजी वाटत होती.

यापूर्वी लिहिले होते की मी पण उत्सुक आहे मतदारांचा निर्णय पाहण्यास! पण खरोखरच सलाम त्या तमाम मतदारांना ज्यांनी अभूतपूर्व निकाल दिला. प्रत्येकालाच धक्कादायक, अविश्वसनीय व अद्भूत!

झालं... आता तरी राजकारणाचा स्तर योग्य राहून राज्याला प्रगतीपथावर

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

नेण्याचा विचार प्रत्येक राज्यकर्त्यांसह, विजेते–पराभूत नेते. त्यांचे कार्यकर्ते प्रामाणिकपणे करतील अशी आशा ठेवणं एवढंच आपल्या नागरिकांच्या हातात आहे.



आपल्या शहरापुरते व जिल्ह्यासंबंधी विचार केला तर युतीचे स्थान प्रभावी झाल्याने यातील तिन्ही पक्षाच्या आमदारांनी विशेष प्रयत्न करून सर्वांगिण विकासाकरिता झटले पाहिजे.

इतर नजीकच्या जिल्ह्याच्या तुलनेत कमी झालेली प्रगती साधण्याचा प्रयत्न झाल्यास यातच त्यांचे व जनतेचेही भले होईल.

# स्थिर सरकारच्या दृष्टीने स्वागतार्ह निकाल...

अस्थिर सरकार हे कुठल्याही राज्याच्या दृष्टीने, विकास –औद्योगिक गुंतवणुकीच्या दृष्टीने हानिकारक ठरत असते या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील जनतेने दिलेला कौल हा स्वागतार्हच ठरतो. गेल्या ५ वर्षातील महाराष्ट्रातील राजकीय घटना या पुरोगामी महाराष्ट्राला कलंक लावणाऱ्या होत्या आणि त्या राजकीय तमाशाला सर्वच्या सर्वच राजकीय पक्ष व नेते जबाबदार होते. गेल्या ५ वर्षात केवळ १३१ दिवसाचे काम विधानसभेत झाले कारण सर्वच राजकीय पक्ष व नेते हे राजकीय कुरघोडी करण्यातच व्यस्त होते .

सरकार महायुतीचे की महाआघाडीचे हा मुद्दा मागील ५ वर्षातील दोन्ही सरकारची कामगिरी पाहता गौण ठरतो कारण दोघांचीही कामगिरी हि एकाला झाकावा तर दुसरा उघडा पडतो अशा प्रकारची होती. त्यामुळे महायुतीला मिळालेला विजय हा त्यांच्या कामाची पावती म्हणून मिळालेला नसून दगडापेक्षा वीट मऊ अशा पद्धतीने मतदारांनी विचार करून किमान पुढील ५ वर्षात तरी मागील ५ वर्षाची पुनरावृत्ती होऊ नये, पुन्हा तोडफोडीचे राजकारण नको आणि केंद्रातील मदतीने चालू असणाऱ्या विकास कामांना ब्रेक लागू नये या दृष्टीने दिलेला कौल आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सरकारच्या कामगिरीपेक्षा लाडकी बहीण योजना व आरएसएसचा सक्रिय सहभाग व लोकसभेत मिळालेल्या यशाने हुरळून जाऊन आत्मविश्वासाचे रुपांतर अहंकारात झाल्याने गाफील झालेली महाआघाडी याचे हे यश म्हणता येईल.

मतदारांनी महाआघाडीला मत द्यावे यासाठीचे मुद्दे जनतेसमोर मांडू न शकल्याने 'पदरी पडलं आणि पवित्र मानलं अशा पद्धतीने लाडकी बहीण योजना व तत्सम कल्याणकारी योजनाना ग्राह्य मानत मतदारांनी महायुतीला कल दिलेला दिसतो. अस्थिर सरकारची पुनरावृत्तीच्या भीतीने महाराष्ट्रातील मतदारांनी अगदी युतीचे उमेदवार पात्र वाटत नसताना देखील अनिच्छेने मतदान केलेले आहे आणि त्यातून महायुतीला लागलेली लॉटरी आहे हे विसरता काम नये.

महायुतीचे सरकार असो की महाविकास आघाडीचे दोन्ही सरकारची जनतेप्रती, जनतेच्या मूलभूत समस्या –प्रश्नाविषयी अनास्था, सरकारच्या प्रामाणिकतेवर असणारे प्रश्नचिन्ह या बाबी लक्षात घेता महाराष्ट्रातील बुद्धिवादी मंडळी, सामाजिक संस्था यांनी अत्यंत सक्रियपणे सरकारच्या कामकाजावर 'तिसरा डोळा' ठेवणे काळाची गरज वाटते. वर्तमान निकाल हा ना युतीचा विजय आहे ना आघाडीचा पराभव. स्थिर सरकारच्या दृष्टीने उपलब्ध पर्यायांपैकी एका पर्यायाला दिलेला सुज्ञ कौल आहे.

भविष्यात तरी महायुती व आघाडीने जात –पात –धर्म अशा ध्रुवीकरणाला खतपाणी घालू नये आणि राज्याचे भवितव्य टांगणीवर लावू नये हि अपेक्षा. त्याच बरोबर 'ईव्हीएम ला' दोष देण्याचा रडीचा डाव खेळू नये. याच ईव्हीएम ने लोकसभेत विजयी कौल दिला होता हे विसरू नये.

शेवटचा आणि महत्वाचा मुद्दा हा आहे की कुठलीही पडताळणी न करता अर्ज करील तो पात्र अशा दृष्टीने राज्याला आर्थिक अस्थिरतेच्या खाईत लोटणाऱ्या राबवण्यात आलेल्या 'लाडकी बहीण' सारख्या तत्सम योजनांमुळे मतदारांना लुभावण्याची परंपरा भविष्यात लोकशाहीच्या दृष्टीने हानिकारक ठरू शकते याचा देखील विचार होणे आवश्यक आहे.

मी व्यक्तिगत पातळीवर कोणत्याही राजकीय पक्षाचा अंधभक्त, निरक्षर चाहता नाही. आणि त्यामुळेच मागील ५ वर्षाचा कार्यकाळ पाहून राज्याच्या दृष्टीने कोणतेही का असेना स्थिर सरकार हवे या दृष्टीने स्वागतार्ह निकाल असे मत मांडत आहे.

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीचे निकाल अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय...

अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय या तीन शब्दात पंधराव्या विधानसभेच्या निकालाचे वर्णन करावे लागेल. अभूतपूर्व म्हणजे या पूर्वी कधीही घडले नाही असे. हो हा निकाल अभूतपूर्व असाच आहे कारण यापूर्वी असा निकाल महाराष्ट्राने कधीही पाहिला नव्हता. २०१४ च्या मोदी लाटेतही जे घडले नव्हते ते आता घडले. महायुतीने तब्बल दोनशे छत्तीस जागा जिंकत महाविकास आघाडीचा सुफडा साफ केला. महाराष्ट्रात महायुतीची लाट नव्हे तर त्सुनामी आली. या त्सुनामीत महाविकास आघाडीचे अनेक गड उध्वस्त झाले. महाविकास आघाडीच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभव पत्करावा लागला. ही त्सुनामी इतकी जबरदस्त होती की पाच महिन्यांपूर्वी जी महाविकास आघाडी अजिंक्य वाटत होती तिला अर्धशतक देखील गाठता आले नाही. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच विधानसभेला विरोधीपक्ष नेता देखील मिळणार नाही अशी अवस्था झाली. हे खरोखरच अभूतपूर्व असेच आहे.

अनाकलनीय या अर्थाने की असा निकाल लागेल असा अंदाज कोणालाच आला नव्हता. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील राजकीय धुरिणांना असा निकाल लागेल असे वाटले नव्हते. खुद्द भाजप आणि महायुतीच्या नेत्यांना देखील हा इतका विराट मिळेल असे वाटले नसेल. भल्या भल्यांना विचार आणि अभ्यास करायला लावणारा असा हा निकाल आहे. महायुतीला या निवडणुकीत महाविकास आघाडीपेक्षा थोड्याफार जागा अधिक मिळतील असा अंदाज होता. महायुती कसाबसा सत्तेचा सोपान चढेल असा अंदाज होता निवडणूक पूर्व चाचणीत ही तेच दाखवण्यात आले होते मात्र प्रत्यक्षात त्याहूनही खूप वेगळे घडले.

अविश्वसनीय या अर्थाने की या निकालावर विश्वास ठेवणे अनेकांना अजूनही कठीण जात आहे. काहीजण या निकालावर अजूनही विश्वास ठेवायला तयार नाही कारण अवघ्या पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत पूर्णपणे वेगळे चित्र पाहायला मिळाले होते. महाविकास आघाडीने आश्चर्यजनक कामगिरी करत लोकसभेच्या ३० जागा जिंकत महायुतीला नामोहरण केले होते. अवघ्या पाच महिन्यात अशी काय जादूची कांडी फिरली की ज्याने इतका मोठा उलटफेर केला ? लोकसभेप्रमाणेच विधान सभेतही महाविकास आघाडीची सरशी होईल असा कयास काहीजण लावत होते त्यामुळेच या निकालावर त्यांचा विश्वास बसत नाही अर्थात कोणाचा विश्वास बसो अगर न बसो जनतेने दिलेला हा निकाल राजकीय पक्षांसह सगळ्यांना स्वीकारावाच लागणार आहे. हा जनतेच्या न्यायालयाने दिलेला निकाल आहे तो स्वीकारूनच विरोधी पक्षांनी या निकालाचे आत्मचिंतन करायला हवे.

या निकालाचे अवलोकन केले तर असे दिसून येते की लोकसभा निवडणुकीत झालेल्या पीछेहाटी नंतर महायुतीने त्या निकालाचे आत्मपरीक्षण करून त्यातील चुका आणि उणीवा दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने सामूहिक प्रयत्न केला त्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नेहमीप्रमाणे साथ लाभली. लोकसभेच्या निवडणुकीनंतर भाजपच्या दिल्लीतील नेत्यांनी छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन प्रचाराचे अतिशय सूक्ष्म व काटेकोर नियोजन केले. याउलट माहविकास आघाडी लोकसभेच्या यशाने हुरळून गेली. लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही आपल्याला सहानुभूती मिळेल या भ्रमात महाविकास आघाडीचे नेते राहिले त्यामुळे त्यांच्यात कोणताही समन्वय नव्हता. जागा वाटप असोत की प्रचार सभा महाविकास आघाडीची एकजूट कोठेच दिसली नाही. महाविकास आघाडीचे नेते सत्ता आपल्यालाच मिळाली या थाटात एकमेकांशी भांडू लागले. मुख्यमंत्रीपदावरून महाविकास आघाडीत रस्सीखेच सुरू झाली. महाविकास आघाडीतील बाष्कळ नेत्यांनी जी बोल बच्चनगिरी केली ती ही त्यांना नडली.

लोकसभा निवडणुकीत झालेली पिछेहाटी नंतर महायुती खडबडून जागी झाली आणि महायुती सरकारने अनेक लोकाभिमुख योजना आणल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक योजना. या योजनेअंतर्गत १५०० रुपये महिलांच्या खात्यावर जमा होऊ लागले. ही योजना महायुतीसाठी गेम चेंजर ठरेल असा अंदाज होता आणि तो खरा ठरला.

यावेळी महिला मतदार मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या. महिला मतदारांची टक्केवारी पाच टक्क्यांनी वाढली. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पदरात भरभरून मतांचे दान टाकले कदाचित त्यामुळेच महायुतीला इतका विराट विजय मिळवता आला. ज्या वेळी ही योजना आली त्यावेळी विरोधी पक्षांनी या योजनेवर टीका केली ही टीका कदाचित महिला मतदारांना रुचली नसावी. राज्यातील महिला मतदारांनी महायुतीला तारलेच नाही तर अक्षरशः उचलून धरले या सर्वांचा परिपाक म्हणजे महायुतीला मिळालेले हे घवघवीत यश. या निकालाने काँगेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या तिन्ही पक्षांना मतदारांनी नाकारून भाजप, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर विश्वास दाखवला आहे त्यामुळे या तिन्ही पक्षांना आता पुन्हा शून्यातून सुरुवात करावी लागेल. अर्थात एका पराभवाने कोणताही पक्ष संपत नसतो झालेल्या चुका दुरुस्त करून या पक्षाने २०२९ चे लक्ष समोर ठेवून पक्षाची बांधणी करावी लागेल. पक्षातील जुन्या बोल बच्चन नेत्यांना बाजूला सारून नव्या दमाचे कार्यकर्ते तयार करावे लागतील. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत त्यावर लक्ष केंद्रित करून या पक्षांनी तयारी सुरू करावी तर महायुतीने जनतेने दिलेल्या अभूतपूर्व यशाचा आदर राखत जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करून महाराष्ट्राला देशातील नंबर १ चे राज्य बनवण्यासाठी प्रयत्न करावेत.

## फुलचंद पहाडे यांचे वृध्दापकाळाने निधन



नगर – येथील फुलचंद शांतीलाल पहाडे (वय ८८, बाकलीवाला) यांचे २४ नोव्हेंबर रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर २५ रोजी मुंबई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी,१ भाऊ, सुना, भावजय, नातवंडे असा परिवार आहे. संजय पहाडे, विजय पहाडे व निता पहाडे यांचे वडील तसेच रमणलाल बाकलीवाल यांचे ते बंधू होत.


## काशीनाथ कोठुळे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – खडकी (ता.नगर) येथील रहिवासी काशीनाथ मारुती कोठुळे (वय ९०) यांचे २४ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर खडकी येथील अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ भाऊ, भाऊजय, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शिवाजी, संभाजी व अशोक कोठुळे यांचे ते वडील होत.

## सुरेश ओस्तवाल यांचे दु:खद निधन



नगर – येथील जेष्ठ उद्योजक सुरेश भगवानदास् ओस्तवाल (वय ७३) (सुरेगांवकर) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, नातवंडे असा परिवार असून स्नायडर कंपनीतील आधिकारी स्वप्निल व उद्योजक संदिप ओस्तवाल यांचे ते वडील होत.

## राकेश रायपेल्ली यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील तोफखान्यातील नवरंग शाळेजवळ राहणारे राकेश ज्ञानेश्वर रायपेल्ली (वय ४०) यांचे २५ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे आई, वडील, पत्नी, आजी, २ भाऊ, भाऊजय असा परिवार आहे. नितीन रायपेल्ली यांचे ते बंधू होत.

## सौ.करुणा गवले यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर – येथील जे.टी.एस. हायस्कूलच्या ग्रंथपाल, गुरुमाऊली पतसंस्थेच्या संचालिका सौ.करुणा ज्ञानेश्वर गवले (वय ५४) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. बेलापूर येथील जे.टी.एस. हायस्कूलचे ज्युनियर कॉलेजचे प्राध्यापक व डी.डी. न्युज चे जिल्हा प्रतिनिधी ज्ञानेश्वर विठ्ठल गवले यांच्या पत्नी होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# पुरोगामी महाराष्ट्राला आत्मपरीक्षण करण्याची गरज

### खऱ्या लोकशाहीची स्थापना होण्यासाठी लोकशाही संरक्षण कायदा आणण्याची गरज निवडणुकीतून पुरोगामी महाराष्ट्राचा ढोंगी अभिमान गळून पडल्याचा आरोप

नगर – नगर – निवडणूक निकालाचे सत्य बाहेर आले. महिलांच्या आर्थिक गुलामगिरीचा विस्फोट व त्यातून पुरोगामी महाराष्ट्राला आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याची भावना ॲड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केली. भारतात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्याय देणाऱ्या खऱ्या लोकशाहीची स्थापना होण्यासाठी लोकशाही संरक्षण कायदा आणण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.



हजारो वर्षे मनुने लादलेल्या स्त्रियांवरील सामाजिक आणि आर्थिक गुलामगिरीचा परिणाम स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतर देखील भारतीय समाजात असल्यामुळे सध्याच्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजनेमुळे बुडत्याला काडीचा आधार मिळाला. असा आधार देणाऱ्या राजकीय पक्षांना झोळी फाड यश मिळाले. यातून संपूर्ण महाराष्ट्राला नव्हे तर देशाला स्त्रियांच्या आर्थिक दुबळेपणाची प्रचिती आली. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर सर्वच राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांचा पराभव झाला असल्याचे पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

या निवडणुकीतून पुरोगामी महाराष्ट्राचा ढोंगी अभिमान गळून पडला आहे. महाराष्ट्रातील स्त्रियांनी लाडक्या बहिणीचे दीड हजार रुपये मिळतात, जर्मन पातेल्यावर मुख्यमंत्र्याचे नाव लिहिले यातच महाराष्ट्रातील स्त्रियांचे दुय्यम दर्जाचे जीवन जगासमोर आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

आर्थिक परावलंबित्व स्त्रियांना जन्मापासून मरेपर्यंत मनु तत्वज्ञानाने लादले. आजही स्वतंत्र भारतात स्त्रिया बहुसंख्येने आर्थिक समस्यांना तोंड देत आहे, ही बाब भारतातील स्त्रियांचे आर्थिक आणि सामाजिक गुलामगिरीचा विस्फोट करणारा निवडणूक निवाडा स्पष्ट करत असल्याचे म्हंटले आहे.

मतदार अक्कलमारी करणाऱ्या पुढाऱ्यांना यश आल्याने यातून सत्तापेंढारी कुबेरशाही मोठी होणार आहे. परंतु एक हजार ते पाचशे रुपयांना मत विकतात, यातून तळागाळापर्यंत लोकशिक्षण आणि आर्थिक न्याय पाझरला नाही ही बाब स्पष्ट होते. इंग्रजांना देशाबाहेर हाकलून दिल्यानंतर गेल्या ३० ते ४० वर्षात भारतात सत्तापेंढारी यांनी कुबेरशाही राबवली. त्यातूनच महिलांचा आर्थिक दुबळेपणा, झोपडपट्ट्यांचा विस्तार आणि रस्त्यांचे खड्डे हे प्रश्न न सोडविता जनतेचा पैसा सत्तापेंढारी घरी घेऊन जातात याला पुरावा देण्याची गरज नसल्याचेही संघटनेच्या वतीने भूमिका मांडण्यात आली आहे.

# मयत मुलाचे पैसे आल्याची बतावणी करत वृद्ध महिलेचे दागिने पळविले

### तपोवन रोड परिसरातील घटना, अनोळखी तरूणाविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – बतावणी करून वृध्द महिलेकडील दोन तोळ्याचे सोन्याचे मिनी गंठण व एक तोळ्याचे कानातील सोन्याचे वेल असा सुमारे ३ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना तपोवन रस्ता परिसरात घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत चंद्रकला साहेबराव शिंदे (वय ५९,रा. महाराष्ट्र बँकेच्या पाठीमागे, तपोवन रस्ता) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीचा मुलगा सोमनाथ २० एप्रिल २०२४ रोजी मयत झालेला आहे. फिर्यादी शुक्रवारी (दि.२२) सकाळी १० वाजता घरी असताना त्यांच्याकडे एक अनोळखी व्यक्ती दुचाकीवरून आला. तुमचा मुलगा सोमनाथ याचा मित्र राशीनकर (पूर्ण नाव नाही) असल्याचे त्याने फिर्यादीला सांगितले. त्यानंतर त्याने तुमच्या मुलाचे पैसे आलेले आहेत, त्यासाठी तुम्हाला तुमच्याकडे असलेल्या सोन्याची पावती द्यावी लागेल. तेव्हा फिर्यादीने त्याला सोन्याची पावती नसल्याचे सांगितले.

माझ्या ओळखीच्या सोनाराकडून सोन्याची पावती तयार करून घेऊ असे त्याने सांगितल्याने फिर्यादी त्याच्या सोबत दुचाकीवर बसून गेल्या. त्याने दुचाकी तपोवन रस्त्यावरील गुंडू गोडाऊन समोर थांबवली व फिर्यादीला दुचाकीच्या खाली उतरून दिले. तुम्ही येथेच थांबा व तुमच्याकडील सोने मला द्या, मी त्याची पावती तयार करून देतो असे सांगितल्याने फिर्यादीने त्यांच्याकडील सुमारे तीन तोळ्याचे सोन्याचे दागिने त्याच्याकडे काढून दिले. तो दुचाकीवरून छत्रपती संभाजीनगर रस्त्याच्या दिशेने निघून गेला. फिर्यादी यांनी त्याची वाट पाहिली असता तो परत आला नाही. आपली फसवणूक झाली असल्याचे फिर्यादीच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# मंदिरात दर्शनाला गेलेल्या महिलेच्या दागिन्याची चोरी

### आगडगाव येथील काळभैरवनाथ मंदिर परिसरातील घटना, गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील आगडगाव येथील काळभैरवनाथ मंदिरात दर्शनाला गेलेल्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाची सोन्याची बोरमाळ अज्ञात चोरट्याने चोरल्याची घटना रविवारी (दि.२४) दुपारी २ ते २.१५ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत रंजना अशोक इंगळे (वय ६७, रा. ब्राम्हण गल्ली, किंग्ज गेट, कोठला) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आगडगाव येथील काळभैरवनाथ मंदिरात दर्शनासाठी दर रविवारी मोठी गर्दी होत असते. फिर्यादी इंगळे या ही रविवारी दर्शनासाठी नगर हून आगडगाव येथे गेल्या होत्या. काळभैरवनाथ मंदिर परिसरात असलेल्या महादेवाच्या मंदिरात त्या दर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी गर्दी मध्ये कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाची सोन्याची बोरमाळ चोरली.

थोड्या वेळाने ही बाब त्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी आरडाओरडा केला. मंदिर परिसरातील सुरक्षा रक्षकांना ही बाब सांगितली. त्यांनी सर्वत्र शोध घेतला मात्र चोरटा सापडला नाही. काळभैरवनाथ मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. मात्र त्या दर्शनासाठी गेलेल्या महादेव मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने चोरट्याचा कुठलाही मागमूस लागला नाही. त्यानंतर त्यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# शेअर बाजारात तेजी, सेन्सेक्स १२०० तर निफ्टीही ३९० अंकांची उसळी

मुंबई – महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा परिणाम सोमवारी (दि.२५) आठवड्याच्या पहिल्या दिवशी, देशांतर्गत शेअर बाजारात स्पष्ट दिसून आला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या अभूतपूर्व विजयाने देशांतर्गत शेअर बाजारात उत्साह संचारला असून सेन्सेक्स आणि निफ्टीने सकारात्मक सलामी दिली. एकीकडे निवडणूक निकालांचा प्रभाव आणि दुसरीकडे काही कंपन्यांशी संबंधित मोठे अपडेट्सच्या पार्श्वभूमीवर बाजारात खरेदीचा जोश वाढू शकतो.

राज्यात भाजपच्या महायुतीला बंपर विजय मिळाल्यानंतर सर्वाधिक फायदा अदानी ग्रुपच्या शेअरला होताना दिसत असून अदानी ग्रुपची प्रमुख कंपनी अदानी एंटरप्राइजेजचा शेअर दोन टक्क्यांपेक्षा जास्त वधारला शेअर बाजारात वाढीला निवडणूक निकाल एक कारण असले तरी आणखी इतर कारणांमुळेही बाजाराला आधार मिळाला आणि गुंतवणूकदार मालमाल झाले. प्री ओपनिंग सेशन दरम्यान बाजारात चांगली वाढ दिसून आली असून प्री–ओपनिंगमध्ये सेन्सेक्स १०७६.३६ वधारला होता.

ग्लोबल बाजारातील सकारात्मक संकेत आणि महा–विजयाचा देशांतर्गत बाजारावर सकारात्मक परिणाम होताना दिसत आहे. दणदणीत सुरुवात केल्यावर आठवड्याच्या पहिल्या व्यवहाराच्या दिवशी, सेन्सेक्स १२०० हून अधिक अंकांनी वधारला आणि ८०,३५० वर उसळला तर एनएसई निफ्टीही ३९० अंकांनी वाढून २४,३०० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. सेन्सेक्समध्ये सूचिबद्ध सर्वच शेअर्समध्ये खरेदी होत असून निफ्टीचे ४९ शेअर्स वधारले तर केवळ एका कंपनीत पडझड होताना एनएसई चे सर्व क्षेत्रीय निर्देशांक वेगाने व्यवहार करत आहेत. या दरम्यान, सरकारी कंपन्यांच्या शेअर्समध्ये पुन्हा एकदा वादळी तेजी दिसून आली.

# गृहिणी

## आरोग्य

### पावसाळ्यात हे करा वर्ज्य

पावसाळ्यात पचनशक्ती मंदावते. त्यामुळे तेलकट, तळकट पदार्थ खाऊ नयेत. पावसाळ्यात भात खाल्ल्याने अंगावर सूज येण्यासोबतच पोट फुगते. त्यामुळे भात प्रमाणात खावा. मिठामुळे पोट फुगते आणि भूक जास्त लागते. त्यामुळे या दिवसामध्ये मीठही कमीच खावे.

पचनास जड असणाऱ्या फ्लॉवर, कोबीसारख्या भाज्या खाऊ नयेत. दह्यामुळे कफ होतो. शीतपेयांमध्ये शरीरातल्या खनिजांचे प्रमाण कमी होऊन पचनक्रियेवर परिणाम होतो.

## पाककला

### तोंडली चना भाजी

**साहित्य** – २५० ग्रॅम तोंडली, १ कप काबुली चने रात्रभर पाण्यात भिजवून नंतर उकडलेले, अर्धा कप नारळाचा खव, २ लाल मिरच्या, अर्धा लहान चमचा धने, अर्धा लहान चमचा जिरे, अर्धा लहान चमचा मोहरी, अर्धा लहान चमचा हळद, चिमूटभर हिंग, ५-६ कढीपत्ते, १ लहान चमचा लिंबाचा रस, चवीनुसार मीठ.

**कृति** – तोंडल्यांचे उभे चार तुकडे करून घ्या आणि बिगर पाण्याच्या वाफेवर शिजवून घ्या. लाल मिरच्या, धने व जिरे मिसळून मिक्सरमध्ये वाटून घ्या. नंतर नारळाचा खव टाकून फिरवा. पाणी घालू नका. कढईत तेल तापवून हिंग, जिरे, मोहरीची फोडणी द्या. नंतर तोंडली, काबुली चने, मीठ व हळद टाका. मंद आचेवर ३ मिनिटे परता. नंतर लिंबाचा रस टाका. चपाती, भाकरी व भातासोबत ही सुकी भाजी सर्व्ह करा.

## वास्तू

### गृहअंतर्गत वास्तूदोष

जर तुमच्या घरातील एखादे टॉयलेट हे घराच्या पूर्व, उत्तर आणि पूर्वोत्तर दिशेला येत असेल, तर हा फार मोठा असा वास्तुदोष मानला जातो. यामुळे सुख, आरोग्य व समृद्धी या तिन्हींवर गंभीर नकारात्मक प्रभाव निर्माण होतो. हा वास्तुदोष दूर करण्यासाठी थोडी चिनी माती, काच वा प्लॅस्टिकच्या प्लेटमध्ये २-३ मुठी खडे समुद्री मोठ घ्या व ती प्लेट घरात ठेवा. या प्लेटमधील मीठ १५-२० दिवसांनी बदलत राहा.

## सौंदर्य

आपण थोडीशी दक्षता घ्याल तर आपले केसही रेशमासारखे मुलायम चमचमते बनवू शकाल. त्यासाठी डोके धुण्याचा अर्धा तास आधी एक लिंबाचा रस दूध वा दह्यात फेटून केसांना लावा.

## सल्ला

कॅसेटचा आवाज खरखरत असेल तर ती थोडावेळ फ्रीजमध्ये ठेवा. आवाज व्यवस्थित येईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. २६ नोव्हेंबर २०२४**

**उत्पत्ति एकादशी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, हस्त २८।३५, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : स्त्री पक्षाकडे लक्ष ठेवा. अधिक श्रम करावे लागतील. आरोग्य मध्यम राहील.

**वृषभ** : व्यापार-व्यवसायात सावधगिरी बाळगा. कौटुंबिक वाद-विवाद टाळा.

**मिथुन** : इच्छित कार्यात यश मिळेल. कौटुंबिक जबाबदारी वाढेल.

**कर्क** : मनोरंजनावर खर्च होण्याची शक्यता आहे. हसत खेळत दिवस जाईल.

**सिंह** : आर्थिक स्थिती संमिश्र राहील. कुटुंबातही वेळ चांगला जाईल.

**कन्या** : देवाण-घेवाणीबाबत काळजीपूर्वक व्यवहार करा.

**तूळ** : नोकरदारांनी कामात लक्ष द्यावे. वाहने काळजीपूर्वक चालवा.

**वृश्चिक** : वरिष्ठ लोकांचे कामात सहकार्य मिळेल. अधिकारी आपणास सहकार्य करतील.

**धनु** : दिवस उत्तम राहील. महत्वाच्या कार्यात यश मिळेल. प्रेमात स्थिती अनुकूल राहील.

**मकर** : वडिलधाऱ्यांचे सहकार्य मिळेल. महत्वाच्या कामात सावधगिरी बाळगा.

**कुंभ** : आरोग्य देखील चांगले राहील. आर्थिक स्थिरतेसाठी वेळ उत्तम आहे.

**मीन** : अधिकाऱ्यांशी वाद-विवाद टाळण्याचे प्रयत्न करा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


गण्याने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली
गण्या – साहेब मला फोनवर धमक्या मिळत आहेत
पोलीस – कोण आहे तो जो तुम्हाला धमक्या देत आहे?
गण्या – एम.एस.ई.बी.वाले म्हणतात...
बिल नाही भरल तर कापून टाकीन

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* कोणत्या देशाचे क्रिकेट खेळाडू बॉल कुरतडतात? – ऑस्ट्रेलिया
* हरितसेना कशाशी संबंधित आहे? – वनीकरण
* म. गांधींचे राजकीय गुरू कोण होते? – गोपाल कृष्ण गोखले
* छत्रपती शिवाजी महाराजांचे सेनापती कोण होते? – हंबीरराव मोहिते

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०५७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) भय; डर ३) येणे ६) मनसब धारण करणारा ९) उत्तराधिकारी; हक्कदार ११) वर हातात धरण्यासाठी दांडा किंवा साखळी असलेला दिवा १५) संकट; अरिष्ट; आपत्ती १६) शे; शंभ १७) गरज; आवश्यकता; जरुरी १८) जखमेतून वाहणारा द्रव २०) समुद्राच्या लाटांचा आवाज २३) धैर्यवान; धीराचा २४) माणूस; मनुष्य २६) सटसटीत एकेरी अंगाचा; काटकोळा

**उभे शब्द :-** १) गायनातील एक राग २) कुठेही गेले तरी पळसाला पाने इतकीच असतात ३) प्रतिष्ठा; आब्रू; नाव ४) दुर्योधन; भीम यांचे शस्त्र ५) एक सुगंधी वनस्पती ७) प्रेत जाळण्यासाठी रचलेली लाकडे वगैरे; चिखल ८) उदाहरण; नमुना १०) एक स्थितिस्थापक पदार्थ १२) स्वार्थी; आप्पलपोट्या १३) दिवस; वासर; दीस १४) एक प्रकारची मोठी वाटी १९) अधिक चांगला; श्रेष्ठ २१) विशिष्ट लोकांचा समाज; ट्राईब २२) प्रबळ इच्छा; उत्कट इच्छा २३) तुकडा; अनेक देशांचा समुच्चय २५) निषध देशाचा राजा

**शब्दगंध क्र. ७०५६ चे उत्तर**



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : तुम्ही जितके चांगुलपणाने वागाल; तितका अधिक चांगुलपणा तुम्हाला प्राप्त होईल.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मृत्यूनंतर मृतदेह कडक का होतो?

माणूस मेल्यानंतर सुरुवातीला त्याचे स्नायू शिथिल होतात व शरीर सैल पडते. ही अवस्था तीन ते चार तास राहते. त्यानंतर मात्र शरीरात काही बदल घडून येतात. स्नायूंतील बदलांमुळे मृतदेह कडक होतो.

स्नायूंमध्ये मायोसीन आणि ॲक्टीन नावाचे तंतू असतात. त्यांच्या आकुंचन-प्रसरणामुळेच स्नायूंचे आकुंचन-प्रसरण होत असते. आकुंचन पावल्यानंतर स्नायू कडक होतात तर प्रसरणामुळे शिथिल होतात. मृत्यूनंतर शरीरात, स्नायूंमध्ये ऊर्जेची निर्मिती होऊ शकत नाही. त्यामुळे मायोसीन व ॲक्टीन हे तंतू एक-दुसऱ्यात मिसळून त्यांचे निर्जलीकरण होऊन एक कडक पदार्थ तयार होतो. साहजिकच या तंतूचे आकुंचन-प्रसरण थांबते व स्नायू व पर्यायाने मृतदेह कडक होतो. या प्रक्रियेला इंग्रजीत रायगर मॉर्टीस असे म्हणतात.

भारतात मृतदेह कडक होण्याची प्रक्रिया मरणानंतर २ ते ३ तासांनी सुरू होते. ही प्रक्रिया पूर्ण व्हायला सुमारे १२ तास लागतात. त्यानंतर १२ तासांत शरीर परत शिथिल होते. मायोसीन व ॲक्टीनचे विघटन झाल्यामुळे स्नायूंचा कडकपणा जातो. रायगर मॉर्टीसमुळे मृत्यूच्या वेळेसंबंधी अंदाज बांधता येतो. दुसरे म्हणजे, मरणाच्या वेळी व्यक्तीची काय अवस्था होती, हेही कळू शकते. असे हे रायगर मॉर्टीस म्हणजेच मृतदेहांचे कडक होणे. गुन्ह्याचा शोध घेण्यासाठी याद्वारे जणू मृतदेहही मदत करतो!

## अडाणी माणूस

एक गरीब आणि अडाणी माणूस शहराबाहेर असलेल्या झोपडीत भाडे भरून राहत होता. झोपडीसमोर रिकाम्या जागी त्याने काही भाजीपाला लावल्या होता. शेजारीच एका बिळात एक ससा राहत होता. तो दररोज त्या भाजीच्या वाफ्यात येऊन त्यातील भाज्या फस्त करीत असे. त्याच्या त्रासाला वैतागून तो माणूस शहरात असलेल्या मालकाकडे जाऊन म्हणाला,''मालक, मी झोपडीसमोरच्या जागेत काही भाजीपाला, फळझाडे लावली आहेत. शेजारचा ससा सारखा तेथे येऊन भाजीपाला, फळझाडे खाऊन जातो. त्यावर दगड फेकले, धावून गेले, त्याला भीती दाखवली तरी तो कशालाच जुमानीत नाही. तेव्हा आपण त्याचा बंदोबस्त केला तर बरे होईल. तेव्हा आपण उद्या तेथे येऊन त्या सशाचा बंदोबस्त करू, असे त्या माणसाला सांगून परत पाठविले. दुसऱ्या दिवशी मालक घोड्यावर बसून बरोबर काही मित्र, कुत्रे असा लवाजमा घेऊन तेथे आला. मग मालक व बरोबर आलेले त्याचे घोडेस्वार मित्र त्या माणसाला म्हणाले, सशाच्या बिळाजवळ जाऊन जोरजोराने शिंग वाजव म्हणजे ससा बाहेर पडताच आम्ही त्याचा समाचार घेऊ. यावर तो माणूस जोरजोराने शिंग वाजवू लागला. कुत्री भुंकू लागली. आवाजाने बिळातील ससा घाबरला आणि बाहेर पडून भाजी व फळझाडांच्या वाफ्यातून सैरावैरा धावू लागला. ससा पाहताच कुत्रीही त्याच्या पाठी लागली. मालक आणि त्याचे घोडेस्वार मित्रही सशापाठी धावू लागले. ससा सर्व भाजीपाल्यात पळत आसरा शोधू लागला. थोड्याच वेळात ससा तेथून निसटून जाण्यात यशस्वी झाला.

बराच वेळ झाला. काही हालाचाल दिसली नाही. तेव्हा सर्वांना कळून चुकले ससा दुसरीकडे पळून गेला आहे. मग त्या माणसाचे लक्ष भाजी आणि फळझाडांच्या पिकाकडे गेले असता त्याचा झालेला विध्वंस पाहून त्याने कपाळाला हात लावला. घोडेस्वार आणि कुत्र्यांनी सर्व पिकात नाचून सर्व मळा उजाड करून टाकला होता.

**तात्पर्य–** कधी कधी रोग परवडला पण औषध नको असे म्हणण्याची पाळी येते.

## जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



### जीवन की रोशनी

मानवी भीतरी परिवर्तन के शीर्ष पर पहुँचकर ही तुम ईश्वरीय आदेश प्राप्त कर सकते हो तथा धरती और आकाश को मिला हुआ देख सकते हो।

पूर्णता की पूजा, जीवन की सबसे ऊँची विद्या है और कोई पूर्ण पुरुष ही अपनी जीवन धारा का संचार करके आत्मा को मन बुद्धि के प्रसारों से स्वतंत्र करके सच के दर्शन करवा सकता है। जो पहले दिन ही दीक्षा देते समय हमारी अन्तरीय आँख खोलकर थोड़ा बहुत ईश्वरीय ज्योति का और अन्तरीय कान खोलकर शब्द ध्वनि का अनुभव दे सकता है, केवल उसे ही पूरा सन्त या पूरा गुरु कहा जा सकता है। शंकराचार्य ऐसे सन्तों के बारे में ही कहता है:– त्रिलोकी में सच्चे गुरु की कोई बराबरी नहीं। यदि कोई पारस नाम की चीज़ है भी तो यह लोहे को केवल सोना ही बना सकता है, पारस नहीं। इसके मुकाबले गुरु अपनी शरण में आने वाले शिष्य को अपने जैसा बना लेता है। इसलिए गुरु की कोई बराबरी नहीं, वह सर्वोच्च है।

गुरु अर्जुन देव जी अपने गुरु रामदास जी के बारे में वर्णन करते हुए फरमाते हैं:–

गुर नालि तुलिन लगई खोजि डिठा ब्रह्माण्ड ।।
(सिरी राग म:५) और आखिर में कहते हैं:–
हरि जिऊ नामु परियो रामदासु ।।
(सोरठ म: ५)

अर्थात् हरि ही रामदास का नाम रखवाकर आया हुआ है। इस व्यस्त संसार में हम इतने अधिक लीन हो चुके हैं कि परमात्मा के बारे में सोचने का हमारे पास समय ही नहीं, जीते जागते प्रभु की उपस्थिति के अभ्यास का बहुत ही कम और उसकी पवित्र संगत में रहने का तो इससे भी कम समय मिलता है । यदि हम उसके बारे में कुछ कहते, बातें करते, पूजा करते और प्रार्थना करते भी हैं तो उसे, करने या अपने आत्मिक भले के लिए उस तक पहुँचने के लिए नहीं बल्कि उससे दातें माँगने के लिए या इसलिए कि वह कठिनाइयों और दुखों कष्टों से हमें बचा ले ।

फिर यदि कभी हम परमात्मा के बारे में गम्भीर होते भी हैं तो उसे बर्फ से ढकी चोटियों, तपते रेगिस्तानों की रेतों, पवित्र सरोवरों या दरियाओं की गहराइयों जैसे चारों ओर सांसारिक वातावरण में ढूँढने का यत्न करते हैं और फिर प्रकृति की प्रारम्भिक शक्तियों जैसे चढ़ता सूरज, ऊपर फैले हुए आकाश, सुन्न, गरजते बादलों, सितारों और इससे भी नीचे गिरकर वृक्षों की जड़ों, छेदों, समुद्र की म छलियों, हवा में उड़ने वाले पक्षियों द्वारा उसकी पूजा करते हैं। कोई आश्चर्यजनक बात नहीं कि सारे प्रयत्न करके भी हम उसे नहीं प्राप्त कर सकते। परमात्मा का अपना कथन है: मैं इतना बड़ा हूँ कि दुनिया में भी नहीं समा सकता। न आकाश की ऊँचाइयों में और न धरती पर समा सकता हूँ परन्तु यह बात आपको आश्चर्यजनक लगेगी कि मैं मोमन (जिज्ञासु) के हृदय में समा जाता हूँ। यदि मुझे मिलने की इच्छा रखते हो तो मुझे वहाँ पर ढूंढो, तुम मुझे ढूंढ लोगे।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

### अंतरीक बल

प्राकृति विरूद्ध है। आप का पेट खराब हो सकता है। जिस से समय को जो कुछ काम निपटाने है तो शुरू में ही कर लो। जैसे जैसे परीक्षा

नष्ट होगा। अगर दिन भर के गंदे कपड़े पहन कर सो जाते है। कोर कोई तो जूते पहन कर सो जाते हैं। इस से नींद का कार्य ठीक नहीं होता। इस लिये साफ कपड़े पहन कर सोना चाहिए।

जब हम छोटे छोटे कार्यों के लिये दूसरों पर निर्भर हो जाते हैं तो हमारा समय भी दूसरों पर निर्भर हो जाता है। नहाने में देर रही है क्योंकि मम्मी ने पानी गर्म नहीं किया। आज पढ नहीं पाए क्योंकि भैया बुक खरीद कर नहीं लाये। कक्षा में देर हो गई क्योंकि धोबी ने कपड़े प्रेस नहीं किये। ऐसे ही किसी न किसी की आड़ ले कर हम अपने काम नहीं करते। इस से समय बर्बाद होता है। अपने काम खुद कीजिए इस से समय बचेगा। हमें व्यस्त तो रहना ही चाहिए परंतु अस्त व्यस्त नहीं रहना। कोई चीज आप कहीं रख देते हैं, जब उसकी जरूरत पड़ती है तो उसे ढूढ़ने में पूरा घर लग जाता है। हम घर वालो से नाराज होते है इस से समय बर्बाद होता है। विद्यार्थी और समय प्रबन्धन (४)

प्यास लगने के बाद कुंआ खोदा जाता हैं तो ऐसा व्यक्ति प्यासा ही मरेगा। वार्षिक परीक्षा आ जाने पर समय का प्रबन्धन करना ठीक वैसा ही है जैसे घर में आग लगने के बाद पानी की तलाश में भटकना । ध्वनि को अनुशासित करने से वह राग बन जाटी है। शब्दो को अनुशासित कर दिया जाए तो वह कविता बन जाती है। पानी को अनुशासित कर दिया जाए तो वह नहर और नदी बन जाती है। जब हम लक्ष्य निर्धरित कर के उसे समय की सीमा में अनुशासित कर देते हैं, तभी वह हमारी सफलता का कारण बन जाता है। जैसे आप की परीक्षा के दिन नजदीक आएंगे आप के समय की कीमत बढ़ती जाएगी। आप की समय सारिणी पिरामिड की तरह हो अर्थात आप में नजदीक आएगी आप को पढ़ाई की ओर पिरामिण्ड की तरह झुकते जाना है। परीक्षा से १५ दिन पहले तक अपना पूरा पाठ्यक्रम खत्म कर लें। इस के बाद उसे दोहराने में लगें। पढ़ाई एक प्रकार से कमरे झाडू लगाने की क्रिया या फर्श की घिसाई करने जैसा है। कमरे में थोडी थोडी देर में झाडू लगाने पर कुछ न कुछ कचरा निकल ही आएगा। फर्श की जितनी घिसाई करेंगे, उस में उतनी ही चमक आएगी। आप जितना अपने विषय को दोहराएगें वह उतना ही दिमाग में पक्का होता जाएगा। तभी आप को अच्छे अंक प्राप्त होंगे।

पढ़ते समय एकाग्रता बनाए रखें। पढ़ने को मन न कर रहा हो एकाग्रता न बन रही हो तब आप मानसिक सेवा कर सकते हैं। आप २० व्यक्तियों की लिस्ट बना लें जिन से आप की कोई अनबन नहीं है और न ही कोई तकरार हुई है। पहले एक नंबर वाले व्यक्ति को कल्पना में अपने सामने देखो। उस व्यक्ति और अपने बीच भगवान शिव के बिंदू रूप को या अपने ईष्ट को देखें। भगवान को ५ बार कहें आप शांति के सागर है, शांति के सागर है। ऐसे ही दूसरे, तीसरे, चौथे और पांचवे व्यक्ति को तरंगें दें। फिर पढ़ना शुरू करें। आप का पढ़ने को मन करेगा और एकाग्रता बनेगी। तरंगे दें। इस अभ्यास को प्रत्येक आधे घंटे में दोहराते रहे आप की पूरा दिन एकाग्रता बनीं रहेगी।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

त्यावर एक कलश त्यात पाणी भरून ठेवा. त्यात पाच विड्याची पाने ठेवावीत व त्यावर नारळ ठेवावा. कलशाला हळद-कुंकवाची पाच बोटे लावावीत. कलशासमोर पाटावरती विड्याच्या पानावर तीन सुपाऱ्या मांडाव्यात (पहिली सुपारी गणपतीची, दुसरी कुलदेवतेची, तिसरी गुरुदेवतेची) या प्रमाणे मांडणी करावी. त्यानंतर सर्व सुपाऱ्यांना हळद-कुंकू, अक्षदा, फुले वाहावीत. कलशाला सुद्धा हळद-कुंकू, फुले, अक्षता वाहाव्यात. गर्भसंस्कार मंत्र म्हणून झाल्यानंतर गव्हाची लापशी करून त्याचा नैवेद्य दाखवावा व घरातील सदस्यांनी तो खावा. गर्भावस्थेत एकदा तरी शुभदिवशी विधिपूर्वक गर्भसंस्कार मंत्र म्हणावेत.

गर्भसंस्कार मंत्र म्हणताना तानपुरा किंवा तबला वादन किंवा साधी घंटी सुद्धा पूजेजवळ सौम्य आवाजात वाजवावी. तबल्याचे किंवा घंटीचे ठोके हे साधारणत: १३०-१४० प्रति मिनिटे असावे.

बाळाला हे ठोके आईच्या हृदयाच्या ठोक्याप्रमाणे वाटतात व त्यामुळे बाळाला सुरक्षित व आनंदी वाटते. मंत्र म्हणण्याआधी भावी माता व पित्याला कुंकू लावावे. गळ्यामध्ये फुलांचा हार घालावा. त्यानंतर मातेने आपल्या उजव्या हातात फ ूल व अक्षता घ्याव्यात व हात पोटावर ठेवावा. भावी पित्याने देखील उजव्या हातात फूल व अक्षता घेऊन पत्नीच्या पोटावर हात ठेवावा.

१) गणेश आराधना :

कुठलेही शुभकार्य निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी सर्वात प्रथम आपण गणेशाची आराधना करतो, हे गणेशा, माझ्या होणाऱ्या बाळावर चांगले संस्कार होऊ दे. तुझा आशीर्वाद त्याच्यावर राहू दे. तुझ्या कृपेने माझी गर्भावस्था व प्रसूती सुखरूप होऊ

श्रीमत महागणाधिपतये नमः।।

ध्यानमंत्र

वक्रतुंड महाकाय कोटिसूर्य समप्रभः।
निर्विघ्नं कुरू मे देव सर्वकार्येषु सर्वदा।।

यानंतर, गणपतीचे स्तोत्र म्हणावे. गणपतीचे स्तोत्र म्हणून झाल्यावर ऋग्वेदामधील शांती मंत्र म्हणावा.

शांती मंत्र:

ॐ भद्रं कर्णेभि:श्रणुयाम देवा: भद्रं पश्येमाक्षभिर्य जत्राः।
स्थिरैः रंगैः तुष्टुवांस: तनूभिः व्यशेम देवहितं यदायुः।।
ॐ स्वस्तिन इन्द्रो वृध्दश्रवाः स्वस्ति नः पूषा: विश्ववेदाः। स्वस्तिनस्तायोः अरिष्टनेमिः स्वस्तिनो बृहस्पतिःर्दधातु ।।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।।

गणेशाची आराधना केल्यानंतर कुलदेवतेची आराधना करण्यासाठी देवीसप्तशती मधील स्तोत्र म्हणावे.

अ) देहि सौभाग्यं आरोग्यं देहि मे परमसुखम्।
रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि।।
ब) सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणी नमोऽस्तुते।।

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००


# अर्थजगत

पेन्शन आणि पेन्शनर्स कल्याण विभागाने पेन्शनधारकांसाठी राष्ट्रव्यापी डिजिटल लाइफ सर्टिफिकेट मोहीम ३.० सुरू केली आहे. ही मोहीम १ ते ३० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत भारतातील ८०० शहरांमध्ये चालवली जाईल, ज्यामध्ये केंद्र आणि राज्य सरकारचे पेन्शनधारक, ईपीएफओधारक आणि स्वायत्त संस्था पेन्शनधारक त्यांचे डिजिटल लाइफ सर्टिफिकेट पेन्शन वितरण बँक किंवा आयपीपीबीमध्ये सहजपणे सबमिट करू शकतात.

## निवृत्तीवेतनधारक आहात?

सुपर सीनियर पेन्शनधारकांसाठी (ज्येष्ठ नागरिक ज्यांचे वय ८० वर्षांपेक्षा जास्त आहे) एक विशेष सुविधा आहे, ज्याद्वारे ते त्यांच्या घरून डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करू शकतात आणि घरोघरी सेवा घेऊ शकतात. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्व पेन्शन वितरण बँका, सीजीआयए, आयपीपीबी आणि युआयडीएआय एकत्रितपणे काम करत आहेत. या अंतर्गत, सर्व सरकारी कार्यालये आणि बँक शाखा/एटीएममध्ये बॅनर आणि पोस्टर्स लावले जात आहेत. सर्व बँकांनी त्यांच्या शाखांमध्ये एक विशेष टीम तैनात केली आहे, ज्यांच्याकडे स्मार्टफोनवर आवश्यक ॲप्स उपलब्ध आहेत. ही टीम पेन्शनधारकांच्या जीवन प्रमाणपत्राची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर करत आहे.

वृद्ध निवृत्ती वेतनधारकांना त्यांचे वय, आजार किंवा अशक्तपणामुळे बँकेच्या शाखांना भेट देता येत नसेल तर बँकेचे अधिकारी त्यांच्या घरी किंवा रुग्णालयात भेट देऊन जीवन प्रमाणपत्रे गोळा करत आहेत. संघटनेचे प्रतिनिधी पेन्शनधारकांना जवळच्या कॅम्पला भेट देऊन डिजिटल लाईफ सर्टिफिकेट जमा करण्यास प्रवृत्त करत आहेत.



■ माहीत हवे

पेन्शनधारकांना डिजिटल पद्धती वापरण्यास मदत करण्यासाठी पेन्शनर्स कल्याण विभागाचे अधिकारी देशभरातील प्रमुख ठिकाणी भेटी देत आहेत आणि त्यांच्या प्रगतीची माहिती घेत आहेत.

डिजिटल लाइफ सर्टिफिकेट ३.० मोहिमेवर सतत लक्ष ठेवून, ३७ लाखांहून अधिक प्रमाणपत्रे तयार झाली आहेत. विशेषत: ९० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या १४,३२९ निवृत्तीवेतनधारकांसाठी आणि ८०-९० वर्षांच्या १,९५,७७१ निवृत्तीवेतनधारकांसाठी हा एक मोठा दिलासा देणारा ठरत आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे सोपी झाली आहे आणि या मोहिमेअंतर्गत, निवृत्तीवेतनधारकांना त्यांची प्रत्यक्ष उपस्थिती नोंदवण्याची गरज नाही, ज्यामुळे त्यांना बरीच सोय झाली आहे.

जर एखाद्या निवृत्तीवेतनधारकाने अंतिम मुदतीत त्याचे डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्याचे पेन्शन थांबवले जाऊ शकते. त्यांचे जीवन प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या जवळच्या सीएससी केंद्र, बँक शाखा किंवा कोणत्याही सरकारी कार्यालयात भेट द्यावी लागेल आणि आधार क्रमांक आणि पेन्शन खात्याच्या तपशीलासह बायोमेट्रिक पद्धतीने जीवन प्रमाणपत्राची पडताळणी करावी लागेल. यासाठी, जीवनप्रमाण डॉट जीओव्ही डॉट इन या वेबसाइटवरील लोकेट सेंटर या पर्यायामध्ये सर्व केंद्रांची माहिती उपलब्ध आहे.

डिजिटल लाइफ सर्टिफिकेट ऑनलाइन सबमिट करण्यासाठी, तुम्ही खाली दिलेल्या पायऱ्या देखील फॉलो करू शकता-

जीवन प्रमाणपत्र ऑनलाइन सबमिट करण्यासाठी, पेन्शनधारकाने प्रथम जीवन सन्मान पोर्टलवर जाणे आणि जीवन प्रमाण ॲप डाउनलोड करणे आवश्यक आहे. जीवन प्रमाण आधार प्लॅटफॉर्म वापरून पेन्शनधारकांचे बायोमेट्रिक प्रमाणीकरण करते. यशस्वी प्रमाणीकरणानंतर, डिजिटल जीवन प्रमाणपत्र तयार केले जाते, जे जीवन प्रमाणपत्र भांडारात साठवले जाते. पेन्शन वितरण एजन्सी ऑनलाइन प्रवेश करू शकते.

जीवन प्रमाणपत्र कसे बनवायचे:

ॲप डाउनलोड करा: तुमच्या संगणकावर किंवा मोबाइलवर जीवन प्रमाण ॲप डाउनलोड करा किंवा जवळच्या जीवन प्रमाण केंद्राला भेट द्या.

आवश्यक माहिती द्या: आधार क्रमांक, पेन्शन पेमेंट ऑर्डर, बँक तपशील आणि मोबाइल नंबर यासारखी माहिती प्रविष्ट करा.

आधार प्रमाणीकरण: तुमचे बायोमेट्रिक तपशील प्रदान करा, जसे की फिंगरप्रिंट किंवा बुबुळ स्कॅन. जीवन प्रमाण आधार प्लॅटफॉर्म वापरून ऑनलाइन प्रमाणीकरण करते.

लाइफ सर्टिफिकेट: एकदा ऑथेंटिकेशन यशस्वी झाले की, जीवन प्रमाण प्रमाणपत्र आयडी तुमच्या मोबाईलवर एसएमएसद्वारे पाठवला जातो. हे प्रमाणपत्र लाइफ सर्टिफिकेट रिपॉजिटरीमध्ये साठवले जाते, जे कधीही आणि कोठेही ॲक्सेस केले जाऊ शकते. जीवन प्रमाण वेबसाइटला भेट द्या, प्रमाणपत्र आयडी प्रविष्ट करा आणि पीडीएफ डाउनलोड करा.

ही प्रक्रिया निवृत्तीवेतनधारकांना जीवन प्रमाणपत्रे तयार करणे सोपे आणि सोयीस्कर बनवते, त्यांना मॅन्युअल प्रमाणपत्रांच्या त्रासापासून वाचवते.

---

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करताना गुंतवणूकदार अनेकदा केवळ शेअर्सच्या किमती वाढण्याकडेच लक्ष देतात. गुंतवणुकीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू ज्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते ते म्हणजे लाभांश. लाभांश केवळ कंपन्यांचे आर्थिक स्थैर्य आणि नफा दर्शवत नाही; तर गुंतवणूकदारांच्या एकूण परताव्यातही महत्त्वाची भूमिका बजावतात. लाभांश (डिव्हिडंड) आपल्या नफ्यामध्ये अतिरिक्त परतावा कसा जोडतो आणि त्यातून गुंतवणूकदारांना कोणते फायदे मिळतात याविषयी अनेक जण अनभिज्ञ असतात.

## लाभांशदायी समभागांत गुंतवणुकीचे फायदे

■ अर्थ विशेष

लाभांशाद्वारे, कंपनी तिच्या नफ्याचा काही भाग तिच्या भागधारकांमध्ये वितरीत करते. ज्या कंपन्या सातत्याने लाभांश देतात त्या सामान्यतः फायदेशीर आणि आर्थिकदृष्ट्या मजबूत मानल्या जातात. शेअर बाजारात प्रचंड चढउतार होत असताना अशा कंपन्यांचे शेअर्स तुलनेने स्थिर राहतात. विशेष म्हणजे लाभांश केवळ मोठ्या कंपन्याच देत नाहीत, तर मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप कंपन्या देखील चांगला लाभांश देतात. अशा कंपन्यांचे शेअर्स सामान्य गुंतवणूकदारांसाठी आकर्षक गुंतवणूक पर्याय असू शकतात.

लाभांश दोन प्रकारे तुमचा नफा वाढवण्यास मदत करतो. लाभांश देणाऱ्या कंपन्या सामान्यतः आर्थिक दृष्ट्या मजबूत असल्यामुळे त्यांच्या शेअरच्या किमती दीर्घकाळात वाढतात आणि गुंतवणूकदारांना दुसऱ्या लाभांशाच्या रुपात कंपनीकडून थेट पैसे मिळतात. तुम्ही कंपनीकडून मिळालेल्या या लाभांश उत्पन्नाचा अतिरिक्त उत्पन्न म्हणूनही विचार करू शकता. एक उदाहरण पाहूया. समजा तुम्ही एका कंपनीचे ५०० शेअर्स ४०० रुपये प्रति शेअर या भावाने विकत घेतले आहेत. या हिशेबाने तुमची एकूण गुंतवणूक रक्कम असेल: रु २,००,०००.

समजा सदर कंपनीचा वार्षिक परतावा १५ टक्के असेल तर तुम्हाला ३०,००० रुपये नफा मिळेल. याशिवाय कंपनीने जर प्रति शेअर १२ रुपये लाभांश दिल्यास त्यातून तुम्हाला ६००० रुपये लाभांश मिळेल. अशा प्रकारे तुमचा एकूण नफा ३६,००० रुपये (रु. ३०,००० + ६,००० रुपये) होईल.

लाभांशाची पुनर्गुंतवणूक

लाभांश म्हणून मिळालेली रक्कम पुन्हा गुंतवल्यास, तुमची एकूण गुंतवणूक वाढते आणि दीर्घकाळात जास्त परतावा मिळतो. अशा प्रकारे, लाभांश एकूण परताव्यात चक्रवाढ दराने फायदेशीर ठरतात.

लाभांश गुंतवणूकदारांच्या नफ्यात अतिरिक्त परतावा कसा जोडतो आणि




त्याचा चक्रवाढ परिणाम काय आहे, हे निफ्टी ५०० निर्देशांक आणि निफ्टी ५०० एकूण परतावा निर्देशांक यांची तुलना करून समजून घेऊ. लाभांशाच्या रूपात मिळालेला परतावा देखील निफ्टी ५०० एकूण परतावा निर्देशांकात समाविष्ट केला जातो. जानेवारी २००० ते जुलै २०२४ पर्यंत, निफ्टी ५०० निर्देशांकाची चक्रवाढ वाढ १२.५% होती, तर निफ्टी ५०० चा वाढीचा दर १४.२% होता. यावरून लाभांशाने या प्रमुख निर्देशांकात अतिरिक्त १.७% परतावा जोडला आहे. जर जानेवारी २००० मध्ये निफ्टी ५०० ध्ये १ लाख रुपये गुंतवले गेले असते तर आज त्याचे मूल्य २६ लाख रुपये झाले असते. निफ्टी ५०० इंडेक्समध्ये त्याच गुंतवणुकीचे मूल्य (लाभांशाशिवाय) रु. १८ लाख झाले असते. याचा अर्थ २४ वर्षांच्या एकूण परताव्यात ३० टक्क्यांपेक्षा जास्त योगदान एकट्या लाभांशाने दिले आहे.

एकूणच, लाभांश देणारे स्टॉक्स गुंतवणुकीत महत्त्वाची भूमिका बजावतात. हे केवळ तुमचा नफा वाढवत नाहीत तर दीर्घकाळासाठी स्थिर उत्पन्नाचा स्रोत देखील बनतात. म्हणूनच, जर गुंतवणुकीतून जास्तीत जास्त परतावा मिळवायचा असेल, तर लाभांश देणारे समभाग आपल्या पोर्टफोलिओचा एक भाग बनवणे हे एक शहाणपणाचे पाऊल ठरू शकते.

---

## ■ जाणून घ्या मायनर डीमॅट खाते म्हणजे काय?

सेबीच्या नियमानुसार १८ पेक्षा कमी वयोगटातील अल्पवयीन मुलांसाठी डीमॅट खाते सुरू करण्याची परवानगी आहे. ते एकप्रकारे मायनर डीमॅट खाते असेल आणि ते अल्पवयीन पाल्यांच्या नावावर सुरू करण्यात येते. परंतु हे खाते पाल्याच्या पालकांकडून हाताळले जाते. मुलांचे वय १८ झाल्यानंतर तो स्वत:च खाते हाताळू शकतो. आपण कोणत्याही बँकेतून किंवा ब्रोकरेज फर्मच्या माध्यमातून मायनर डीमॅट खाते सुरू करू शकता. ऑनलाइन आणि ऑफलाइन खाते सुरू करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

**शेअर बाजारातील गुंतवणुकदारांची वाढती संख्या हा एक सकारात्मक संकेत आहेत. अर्थव्यवस्थेचा वेग आणि डीमॅट खात्यांची वाढती संख्या ही गुंतवणुकदारांचा उत्साह सांगणारी आहे. तुम्हाला तुमच्या लहान मुलांच्या भविष्यासाठी गुंतवणूक करायची असेल तर मायनर डीमॅट खाते हा एक चांगला पर्याय राहू शकतो.**

### मायनर डीमॅट सुरू करण्याची प्रक्रिया

- मुलांसाठी जन्माचा दाखला, बाल आधार कार्ड किंवा शाळा सोडल्याचा दाखला या कागदपत्रांची गरज भासते.
- पालकासाठी पॅन कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट, वाहन परवाना, मतदान ओळख पत्र किंवा सरकारने जारी केलेले कोणतेही कागदपत्रे आवश्यक असतात.
- आपण कोणत्याही बँकेकडून किंवा ब्रोकरेज फर्मच्या माध्यमातून मायनर डीमॅट खाते सुरू करू शकता. खाते सुरू करण्यासाठी अर्ज सादर करावा लागेल.

### डीमॅट खात्यातून शेअर खरेदी नाही

- अल्पवयीन डीमॅटधारक शेअर खरेदी करू शकत नाहीत. मात्र त्यांचे पालक त्यांच्याकडे असलेले रोखे या डीमॅट खात्यात स्थानांतरित करू शकतात किंवा रोखे खरेदी करून अल्पवयीन मुलांच्या खात्यात स्थानांतरित करू शकतात. अल्पवयीन मुलांना स्वत:हून डीमॅट खाते सुरु करण्याची परवानगी नसल्याने केवळ मुलांचे पालकच त्यांच्यासाठी खाते सुरू करू शकतात. मायनर डीमॅट खात्याला ओव्हरड्राफ्टची सुविधा नसावी. या खात्यातून शेअर खरेदी केवळ वयाच्या अठराव्या वर्षानंतर करता येते. पालकाकडून अल्पवयीन पाल्याला शेअर गिफ्ट करता येते. मायनर डीमॅट खात्यात जमा असलेल्या पैशावर व्याज मिळत नाही.

### इंट्रा ट्रेडिंग नाही

- मायनर डीमॅट खात्याची वेळोवेळी केवायसी करणे गरजेचे असते. मायनरच्या फोटोबरोबरच आई वडिलांना देखील केवायसी फॉर्मवर स्वाक्षरी करावी लागते. मायनर खात्यांतून इंट्रा डे ट्रेडिंग करता येत नाही. नियमानुसार कोणताही अल्पवयीन पाल्य आर्थिक व्यवहार करू शकत नाहीत. या खात्यातून थेटपणे शेअर बाजार किंवा म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करता येत नाही. उलट गिफ्ट म्हणून मिळालेले शेअर या पाल्यांच्या खात्यात ठेवता येतात.

### पाल्य १८ वर्षांचा झाल्यानंतर

- डीमॅट खातेधारक अल्पवयीन पाल्य हा सज्ञान झाल्यानंतर




ते खाते आपोआप नियमित खात्यात रुपांतरीत होते. यासाठी कागदपत्रे जमा करावी लागतात. नव्याने अर्ज भरून मायनर खाते नियमित खाते करता येते. तसेच अल्पवयीन डीमॅटधारकाच्या खात्यात उत्पन्न जमा होत असेल आणि भांडवली नफा मिळत असेल तर ते उत्पन्न पालकाच्या उत्पन्नाला जोडले जाईल.कलम ६४ (१ ए) नुसार उत्पन्न गृहित धरले जाईल आणि जुन्या कर व्यवस्थेनुसार या खात्यावर मिळवलेल्या उत्पन्नावर दीड हजारांपर्यंत पालकांना करसवलत मिळवता येते.

### मायनर डीमॅट खाते सुरू करण्याचे फायदे

- मुलांच्या भविष्यासाठी बचतीचा हा एक चांगला मार्ग आहे.
- मुलांचे शिक्षण, विवाह अणि अन्य खर्चासाठी पैशाची बचत करण्यासाठी मदत करते.

---

जेव्हा आपण आपल्या भविष्यासाठी आर्थिक योजना बनवतो तेव्हा आपल्या मनात एक प्रश्न नेहमी येतो, आपण आपल्या आर्थिक उद्दिष्टांसाठी लागणारे पैसे वाचवू शकू का? उदाहरणार्थ, मुलांच्या उच्च शिक्षणासाठी किंवा निवृत्तीनंतरच्या आर्थिक गरजांसाठी पुरेसे पैसे उभे करता येतील का? ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आपली गुंतवणूक किती वेगाने वाढली पाहिजे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. गुंतवणुकीचे विशेष नियम यामध्ये मदत करतात - नियम ७२ आणि नियम ११४ हे यामध्ये प्रभावी मानले जातात

## दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी प्रभावी नियम

■ गुंतवणूक

### काय आहे नियम ७२?

नियम ७२ हा एक साधा फॉर्म्युला आहे जो तुम्हाला सांगतो की तुमची गुंतवणूक दुप्पट होण्यासाठी किती वेळ लागेल. उदाहरणार्थ, एखाद्या योजनेतील तुमच्या गुंतवणुकीवर तुम्हाला ८% दराने व्याज मिळत असेल, तर तुमचे पैसे ९ वर्षांत दुप्पट होतील (७२/८ = ९). आर्थिक नियोजन करताना हा नियम वापरणे फायदेशीर ठरते. कारण यामुळे तुमची गुंतवणूक वाढण्यासाठी लागणाऱ्या वेळेचा अचूक अंदाज लावता येतो.




### नियम ११४ म्हणजे काय?

नियम ११४ तुमची गुंतवणूक तिप्पट करण्यासाठी लागणाऱ्या वेळेची गणना करतो. हे जाणून घेण्यासाठी, तुम्हाला मिळणाऱ्या व्याजदराने किंवा तुमच्या गुंतवणुकीवर मिळण्याची अपेक्षा असलेल्या व्याज दराने तुम्हाला ११४ ला विभाजित करावे लागेल. उदाहरणार्थ, जर तुम्ही १० टक्के व्याजदर असलेल्या योजनेत गुंतवणूक करत असाल, तर तुमचे पैसे अंदाजे ११.४ वर्षांत तिप्पट होतील (११४/१० = ११.४). नियम ११४ दीर्घकालीन गुंतवणुकीचे उद्दिष्ट साध्य करण्यातही खूप मदत करतो. उदाहरणार्थ, १० वर्षांनंतर मुलांच्या उच्च शिक्षणासाठी किंवा लग्नाच्या खर्चासाठी निधी उभारण्याची योजना करणे खूप सोपे होते.

### ६ वर्षांत पैसे दुप्पट कसे करायचे?

समजा तुम्ही ५ लाख रुपये गुंतवायचे ठरवले आहे आणि तुम्हाला ६ वर्षांनंतर काही महत्त्वाच्या खर्चासाठी १० लाख रुपयांची गरज आहे. यासाठी तुम्हाला अशी योजना निवडावी लागेल जी वार्षिक १२ टक्के परतावा देईल. तरच नियम ७२ नुसार तुमचे पैसे ७२/१२ मध्ये म्हणजे ६ वर्षांत दुप्पट होतील. भारतात सध्या अशी कोणतीही निश्चित उत्पन्न योजना नाही जिथे वार्षिक १२ टक्के परतावा मिळू शकेल. म्हणूनच, तुम्हाला इक्विटी म्युच्युअल फंडासारखे पर्याय निवडावे लागतील, जे दीर्घकाळात चांगला परतावा देऊ शकतात.

समजा तुम्ही ५ लाख रुपये गुंतवले आणि १० वर्षांनंतर तुम्हाला १५ लाख रुपयांची गरज आहे. अशा परिस्थितीतही तुम्हाला किमान १२ टक्के वार्षिक परतावा असलेल्या योजनेत गुंतवणूक करावी लागेल. तरच नियम ११४ नुसार, तुमचे पैसे ११४/१२ मध्ये म्हणजे ९.५ वर्षांत तिप्पट होतील. भारतातील निश्चित उत्पन्न योजनांमध्ये गुंतवणूक करून असा परतावा मिळणे शक्य नाही, म्हणून यासाठी इक्विटी म्युच्युअल फंड किंवा इतर उच्च-परताव्याचे पर्याय शोधावे लागतील.

वरील उदाहरणे स्पष्टपणे दर्शवतात की नियम ७२ आणि नियम ११४ गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे दुप्पट किंवा तिप्पट होण्यासाठी किती वेळ लागेल हे जाणून घेण्यास मदत करतात. हे नियम म्हणजे महत्त्वाची साधने असून त्यांचा वापर करून तुम्ही तुमचे आर्थिक नियोजन अधिक प्रभावीपणे तयार करू शकता आणि महागाईवर मात करत गुंतवणुकीला योग्य दिशा देऊ शकता.

---

## क्रेडिट कार्ड बंद करताना...

■ प्लास्टिक मनी

अनेक वेळा, काही कारणांमुळे, लोकांना त्यांचे क्रेडिट कार्ड बंद करायचे असते. काही क्रेडिट्सवर विविध प्रकारचे शुल्क आकारले जाते, ज्यामुळे अनेकांना त्याचा त्रास होतो. अशा स्थितीत त्यांना क्रेडिट कार्ड बंद करणे योग्य वाटते. क्रेडिट कार्ड बंद करणे फार कठीण काम नाही, ते सहजपणे बंद केले जाऊ शकते. कार्ड बंद केल्यामुळे तुमच्या अनावश्यक




खर्चाला आळा बसेल आणि तुम्ही तुमच्या खात्यात काही अतिरिक्त पैसे वाचवू शकाल.

क्रेडिट कार्ड बंद करण्यासाठी या ५ सोप्या स्टेप्स फॉलो कराव्या लागतील.

- **प्रथम तुमची थकबाकी अदा करा** : कोणतेही क्रेडिट कार्ड बंद करण्यापूर्वी तुम्हाला त्याची संपूर्ण देय रक्कम भरावी लागेल. तुमची थकबाकी किरकोळ असली तरीही तुम्ही तिची परतफेड करेपर्यंत तुमचे क्रेडिट कार्ड बंद केले जाणार नाही.
- **तुमचे रिवॉर्ड पॉइंट रिडीम करा** : क्रेडिट कार्ड बंद करण्याच्या घाईत बरेच लोक त्यांचे रिवॉर्ड पॉइंट रिडीम करायला विसरतात. तुम्ही ते क्रेडिट कार्ड वापरून खर्च केलेल्या सर्व पैशांसाठी रिवॉर्ड पॉइंट मिळवले आहेत. अशा परिस्थितीत, कार्ड बंद करताना, रिवॉर्ड पॉइंट्स रिडीम करण्यापूर्वी अजिबात संकोच करू नका.
- **सूचना तपासा** : बऱ्याच वेळा कार्डधारक त्यांच्या क्रेडिट कार्डवर काही आवर्ती पेमेंटसाठी स्थायी सूचना ठेवतात, जसे की विमा प्रीमियम, ओटीटी मासिक शुल्क किंवा इतर काही. कार्ड बंद करण्यापूर्वी, त्यावर अशी कोणतीही सूचना नाहीत याची खात्री करा, अन्यथा कार्ड बंद झाल्यानंतर तुमचे पेमेंट थांबू शकते. प्रीमियम थांबल्यास, तुमची पॉलिसी धोक्यात येऊ शकते.
- **बँकेला कॉल करा** : पुढील पायरी म्हणजे तुम्हाला तुमच्या क्रेडिट कार्ड बँकेला कॉल करावा लागेल. कार्ड बंद करायचे आहे हे त्यांना सांगावे लागेल. बँकेकडून क्रेडिट कार्ड बंद करण्याचे कारण विचारले जाऊ शकते. कार्डधारकाला त्याचे उत्तर द्यावे लागेल. यानंतर, आवश्यक माहिती घेतल्यानंतर, क्रेडिट कार्ड बंद करण्याची विनंती केली जाईल. बँक तुम्हाला ईमेल पाठवण्यास सांगेल किंवा कार्ड कापून त्याचा फोटो ईमेल करण्यास सांगू शकते.
- **कार्ड कापायला विसरू नका**: तुमचे क्रेडिट कार्ड बंद करण्यासाठी, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ते तिरपे कापून टाकणे. अन्यथा, ती चुकीच्या हातात पडल्यास, त्यातून तुमची काही माहिती चोरीला जाण्याची शक्यता आहे किंवा तुमच्या नावाने काही फसवणूक होण्याची शक्यता आहे. कार्ड फक्त डस्टबिनमध्ये टाकू नका, आधी कापून टाका आणि नंतर फेकून द्या.

---

## एक टक्क्यांची अट रद्द

भांडवली बाजार नियामक सेबीने कंपन्यांसाठी व्यवसाय सुलभ करण्याच्या उद्देशाने पावले उचलताना, प्रारंभिक समभाग विक्रीतून (आयपीओ) प्रस्तावित निधी उभारणीच्या १ टक्के रक्कम अनामत ठेव म्हणून राखण्याची गरज रद्द केली आहे. सेबीने तात्काळ प्रभावाने हा बदल लागू केला आहे.



प्राथमिक बाजारात आयपीओ आणण्याआधी कंपन्यांना सेबीकडे अनामत ठेव बाजारमंचाकडे जमा करावी लागते. गुंतवणूकदारांच्या व्यवहाराशी संबंधित तक्रारींचे निराकरण करताना, त्याला अर्जाचे पैसे परत करणे, समभागांचे वाटप आणि प्रमाणपत्रे पाठवणे यासाठीचा खर्च भागवण्यासाठी १ टक्के अनामत ठेव कंपन्यांसाठी बंधनकारक होती.

आता मात्र 'अस्बा' आणि 'यूपीआय'च्या माध्यमातून आयपीओसाठी अर्ज करता येत असल्याने, म्हणजेच गुंतवणूकदारांच्या खात्यातून पैसे बळतेच होत नसल्याने, त्याच्या परतफेडीचा प्रश्न अथवा त्यासंबंधाने तक्रारींची चिंताही कमी झाली आहे. शिवाय डिमॅट खात्यांचा वापर रुढ झाल्यामुळे भौतिक प्रमाणपत्रे पाठवण्याचा प्रश्नही उद्भवत नाही, असे सेबीने नमूद केले आहे.

# संविधान; भारताचा राष्ट्रीय ग्रंथ

आज २६ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतीय संविधानाला यावर्षी ७५ वर्ष पूर्ण होत आहे. गेली ७५ वर्ष संविधानाने देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही संविधानामुळेच जिवंत आहे. संविधान हा देशाचा राष्ट्रीय ग्रंथ आहे. देशाचे अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे. भारतातील विविधता, अनेक भाषा, संस्कृती, धर्म, जात, पंथ, वंश, वेगवेगळ्या चालीरीती, रूढी-परंपरा या सर्वांन एका सूत्रात बांधणारा गुरुमंत्र म्हणजे संविधान.

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडविण्याच्या व त्याचा सर्व नागरिकांस; सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून; आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत.

ही भारतीय संविधानाची उद्देशिका आहे. संविधानाची उद्देशिका हाच संविधानाचा आत्मा आहे. संपूर्ण संविधान याच उद्देशिकेवर आधारित आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य यांना फार महत्त्व देण्यात आले आहे. स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क हे मूलभूत हक्क घटनेने नागरिकांना बहाल केले आहेत. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय प्रतीकांचा मान राखणे, संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम राखणे, सार्वजनिक मालमत्तांची काळजी घेणे, देशासाठी नेहमी तत्पर राहणे ही मूलभूत कर्तव्यही संविधानात दिली आहेत. आपल्या हक्कांसोबत आपल्या कर्तव्याचीही जाणीव करुन देणारे व जगातील सर्वात मोठे असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास जाणून घ्यायला हवा.

२६ जानेवारी १९३० ला लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंडित नेहरूंनी तिरंगा फडकावून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. त्याच महत्वपूर्ण दिवसाचे स्मरण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे कामकाज सुरू झाले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बी एन राव हे या समितीचे सल्लागार होते. या समितीत पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, मौलाना आझाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एस. आर. जयकर, सरोजिनी नायडू, हंसाबेन मेहता, राजकुमारी कौर यांचा मान्यवर सदस्य म्हणून समावेश करण्यात आला होता. घटना समितीच्या ११४ बैठका झाल्या होत्या. घटना समितीने ११ उपसमित्या देखील नेमल्या होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४७ रोजी स्वीकारण्यात आला. तोच २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी भारताच्या संविधान समितीच्या मसुदा समितीने संविधानाचा कच्चा मसुदा तयार करून तो चर्चा विनिमयासाठी सभागृहात ठेवला. त्यावर २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतकी प्रदीर्घ चर्चा झाली आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तिचा स्वीकार करण्यात आला.

संविधान समितीने मसुदा समितीवर सात सदस्यांची नियुक्ती केली होती. त्यापैकी एक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यानंतर अलादी कृष्ण स्वामी अय्यर, के. एम मुन्शी, गोपाल अय्यंगार, एम. माधवराव, मोहम्मद सादुल्ला, डी. सी. खेतान हे इतर सदस्य होते. असे जरी असले तरी त्यापैकी एकाचे निधन झाले होते, एक अमेरिकेत निघून गेले होते, एकाने राजीनामा दिला होता आणि एक सदस्य पूर्णवेळ राजकारणात व्यस्त होते. त्यामुळे संविधानाचा मसुदा तयार करण्याची पूर्ण जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली व त्यांनी ती जबाबदारी अत्यंत निष्ठेने आणि तन्मयतेने पार पाडली आणि एकट्यानेच संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून तो घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ जानेवारी १९४९ सुपूर्द केला. शेवटी २४ जानेवारी १९५० रोजी अंतिम बैठक झाली आणि २६ जानेवारी १९५० पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक राज्य बनले त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस आपण मोठ्या उत्साहात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. संविधान निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. जगातील विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक अशी राज्यघटना तयार केली म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते.

# संविधान दिनानिमित्त २६ नोव्हेंबरला नगरमध्ये संविधान जागर महोत्सव

## रॅलीसह संविधान सर्वांसाठी व्याख्यान

नगर- मानवाधिकार अभियान व सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, सहायक आयुक्त कार्यालय समाजकल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व जिल्ह्यातील समविचारी संस्था, संघटना, महाविद्यालये व सामाजिक कार्यकर्ते यांच्या पुढाकारातून अहिल्यानगर शहरामध्ये २६ नोव्हेंबरला संविधान दिनानिम्मित्ताने संविधान जागर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

संविधान जागर महोत्सवाविषयी अधिक माहिती देतांना मानवाधिकार अभियानाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. संतोष गायकवाड यांनी सांगितले कि, मानवाधिकार अभियानाच्या माध्यमातून दरवर्षी संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. संविधान जागर महोत्सवाचे यंदाचे ०७ वे वर्ष आहे. याहि वर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन मोठ्या उत्सवाच्या स्वरुपात साजरा करण्याचा मानवाधिकार अभियान तसेच अहील्यानगर येथील सर्व पुरोगामी संस्था संघटना यांचा मानस आहे.

संविधान जागर महोत्सवाअंतर्गत यावर्षी संविधान रॅलीच्या सोबतच २६ नोव्हेंबर संविधान दिन ते १० डिसेंबर मानवाधिकार दिन या दरम्यान संविधान जागर पंधरवडा साजरा करण्यात येणार असून संविधानाचा अधिकाधिक प्रचार व्हावा म्हणून संविधान जागर रथ, पथनाट्य, संविधान गीते, प्रबोधनपर व्याख्याने, चर्चासत्रे, शासकीय योजनांची प्रचार प्रसिद्धी या स्वरुपात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त कार्यालय समाजकल्याण विभागाचे प्रवीण कोरगंटीवार यांनी दिली.

संविधान जागर महोत्सवाचे नवनियुक्त स्वागताध्यक्ष अशोक सब्बन म्हणाले कि २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० ते ११ दरम्यान संविधान जागर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या अंतर्गत शहरातून संविधान जागर रॅली काढण्यात येणार आहे. रॅलीचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा – महात्मा फुले यांचा पुतळा –डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा – सीएसआरडी महाविद्यालय असा असणार असून सीएसआरडी महाविद्यालय येथे संविधान जागर सभेने रॅलीचा समारोप होणार आहे. सीएसआरडी सभागृहात होत असलेल्या व्याख्यानासाठी पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश पवार यांचे मार्गदर्शन लाभणार आहे तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संविधान अभ्यासक व प्रचारक सुभाष वारे हे असणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी सिध्दीराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे हे उपस्थित असणार आहे.

या संविधान जागर रॅलीस जास्तीत जास्त संस्था, संघटना, महाविद्यालयाचे विध्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते यांनी सहभागी होऊन खारीचा वाटा उचलावा व भारतीय संविधान संवर्धनासाठी आपले बहुमोल योगदान द्यावे असे आवाहन यावेळी स्वागताध्यक्ष म्हणून अशोक सब्बन यांनी केले आहे.

संविधान जागर महोत्सवाअंतर्गत कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ॲड. संतोष गायकवाड ९०२८५१००२४, संध्याताई मेढे ७७०९९८५५५५, सॅम्यूएल वाघमारे ८७८८४१२७८० यांच्याशी संपर्क साधावा.

# हा विजय महायुतीचा, विकासाचा, विश्वासाचा व विचारधारेचा : आ. संग्राम जगताप




संग्राम जगताप यांनी विजयानंतर निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांच्याकडून प्रमाणपत्र स्वीकारले. यावेळी प्रा. माणिक विधाते, सुवेंद्र गांधी, विपुल शेटीया सुमित कुलकर्णी, ॲड.प्रसन्न जोशी आदी उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात अजित पवार यांचे अभिनंदन करताना संग्राम जगताप

नगर – विधानसभा निवडणुकीत नगरच्या जनतेने विकास कामांवरच विश्वास असल्याने दाखवून दिले आहे. माझ्या या विजयात महायुती मधील सर्वच पक्षांचे मोठे योगदान आहे. विशेषतः सर्व नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी गेल्या महिनाभरापासून भरपूर मेहनत घेत प्रत्येक घरापर्यंत माझा प्रचार केल्यानेच हे यश प्राप्त झाले आहे. हा विजय महायुतीचा, विकासाचा, विश्वासाचा व विचारधारेचा आहे. प्रचारात दिलेले सर्व आश्वासने प्रत्यक्षात आणण्यासाठी मी कटीबद्ध असून मेट्रो सिटीचेही स्वप्न मी पूर्ण करणारच आहे. अहिल्यानगरच्या सर्व मतदार बंधू भगिनींनी मला मोठ्या मताधिक्याने निवडून दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानतो, अशा प्रतिक्रिया आ. संग्राम जगताप यांनी विजयाचे प्रमाणपत्र स्वीकारल्यानंतर दिल्या.

विधानसभा निवडणूकीत महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांनी विजय मिळवत हॅटट्रिक केली आहे. विजया नंतर शहरात सर्व भागांमध्ये नागरिकांनी विजयाचा जल्लोष साजरा केला. आ.जगताप यांचे अभिनंदन करण्यासाठी जनसागर लोटल्याने त्यांनी रात्री उशिरा मतमोजणी केंद्रावर जाऊन निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांच्या कडून विजयाचे प्रमाणपत्र स्वीकारले. यावेळी प्रा. माणिक विधाते, भाजपचे सुवेंद्र गांधी, माजी नगरसेवक विपुल शेटीया, सुमित कुलकर्णी, ॲड.प्रसन्न जोशी आदी उपस्थित होते.

संग्राम जगताप यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांची रविवारी मुंबईत भेट घेऊन राज्यात पक्षाने मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. अजित पवार यांनीही आ.जगताप यांचे हॅटट्रिक केल्याबद्दल अभिनंदन करून कौतुक केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना आमच्या अशीलाच्या वतीने अशीलाकरीता त्यांनी दिलेल्या माहिती नुसार या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **१) अमोल कमलाकर मेहेत्रे २) प्रदिप कमलाकर मेहेत्रे ३) प्रमोद कमलाकर मेहेत्रे ४) सौ. सुचिता सुरेश यमगर रा. पुणे** यांनी ती मिळकत निर्वेध निजोखमी बोजारहित असलेबाबत आमचे अशिलास खात्री व भरवसा देऊन सदर मिळकत विक्री करणेबाबत आमचे अशिलांबरोबर सौदा, ठराव केलेला आहे. त्या मिळकतीचे खरेदीखत आमचे अशिल करून घेणार आहेत. तथापि परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकती संदर्भात कोणाच्याही गहाण, दान बक्षिसपत्र, वारसाहक्क, अन्नवस्त्र बोजा, कोर्टजप्ती, मनाई हुकूम, चालु वाद अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती तक्रारी खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसात समक्ष कळवाव्यात. मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हरकती प्राप्त न झालेस परिशिष्टातील मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित असून संबंधितांनी त्या मिळकतीमधील त्यांचे हक्क जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील तदनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**"परिशिष्ट"**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा तुकडी अहमदनगर पोट तुकडी ता. नगर पैकी मौजे केडगाव येथील शहर अहमदनगर येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्लॉट जमीन मिळकत खालील वर्णनाची

| गट नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ३६७/१/४३९/१ | ४४, ४५, ४६ | ४४६.४४ चौ.मी. |

अमोल, प्रदिप आणि प्रमोद मेहेत्रे यांची सामाईक क्षेत्र प्लॉट नं. ४६ चे क्षेत्र १.५९.४४ चौ.मी. आणि प्लॉट नं. ४५ चे क्षेत्र १.४३.५ चौ.मी. व सौ. सुचिता सुरेश यमगर क्षेत्र प्लॉट नं. ४४ चे क्षेत्र १.४३.५ प्रमाणे असलेली मालकी, कब्जा, वहिवाटीची मिळकत.

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – रस्ता दक्षिणेस – रस्ता
पश्चिमेस – प्लॉट नं. ४३ उत्तरेस – प्लॉट नं. ५१, ५२, ५३

येणेप्रमाणे चतु:सीमापुर्वक मिळकत नांगरण्याच्या, कसन्याच्या, मशागतीच्या आणि मालकी हक्काच्या, वागणूकीचे, वहिवाटीचे व इतर हक्कासह त्यात असलेल्या सर्व तदंगभुत वस्तुसुद्धा खाली काहीही एक राखून न ठेविता.

तारीख – २५/११/२०२४
अहमदनगर

**ॲड. अमोल बनकर**
मो. ९४०५५७०९५७

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **इकबाल बाबुभाई शाह** रा. रामचंद्रखुंट, अहमदनगर. यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवुन इकबाल बाबुभाई शाह लिहुन देणार व संमती देणार **१. शैला विजय गायकवाड २. विक्रम विजय गायकवाड** रा. हनुमान मंदीर जवळ,४शहा कॉम्प्लेक्स, यशवंत नगर गोविंदपुरा, अहमदनगर यांनी मा. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांच्या कार्यालयात रजिस्टर साठेखत लिहुन व नोंदवुन दिले आहे. सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत,असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई,दावा,लिज,गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा तुकडी अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे भिंगार** येथील गोविंदपुरा भागातील शाह हौसिंग कॉम्प्लेक्स मे. दु. निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स.नं. | आर.चौ.मी. | रु. पै. |
|---|---|---|
| ३४३/१३अ / २ब / १ | ०.७२.३० | ७२३.०० |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचा प्लॉट नं. १८१ चे याचा ब्लॉक नंबर ४ असुन प्लॉटचे क्षेत्र ३८.५५ चौ. मी. हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील बांधकाम क्षेत्र २७.७५ चौ. मी. मिळकतीबाबत.

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – ब्लॉक नं. ५, दक्षिणेस – अंतर्गत रस्ता
पश्चिमेस – ब्लॉक नं. ३ उत्तरेस – प्लॉट नं. ३

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. २५/११/२०२४
अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

दि. २५/११/२०२४

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार आमचे आशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर व्यवहारापोटी आमचे आशिलांनी विद्यमान मालकांना विसार रक्कम दिलेली आहे. सदर प्लॉट निर्वेध, निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे, परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर प्लॉटबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष, लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या प्रमाणित नकलांसह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकत वर्णन :**- जिल्हा तुकडी व पोट तुकडी अहमदनगर पैकी मा. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कक्षेतील **मौजे नालेगाव** येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील निर्वेध, निजोखमी प्लॉट मिळकत खालील वर्णनाची :-

| गट क्रं./स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ५३/१ते४ | २३६ | ५२६.४७ चौ.मी. |

याचा संगणकीय उताऱ्याप्रमाणे गट क्रमांक व उपविभाग ५३ / १ ते ४ /२३६ चे क्षेत्रफळ ५.२६.४७ आर.चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट.

**यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे** -

पूर्वेस : १८ मिटर रुंदीचा डी. पी. रस्ता,
दक्षिणेस : प्लॉट नं. २३७,
पश्चिमेस : प्लॉट नं. २२३,
उत्तरेस : १८ मिटर रुंदीचा रस्ता.

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक** -
**श्री. विकी दिलीप मुथ्था,**
रा. कराचीवाला नगर, अहमदनगर.

**ॲड. शामसुंदर व्हि. भुतडा**
ऑफिस : शॉप नं. ९, पुजा अपार्टमेंट,
सहकार सभागृह रोड, अहमदनगर. मो.नं. ९४२३७९२९२२

## जाहीर नोटीस

दि. २५/११/२०२४

तमाम लोकांस या जाहिर नोटीस द्वारे कळविणेत येते की, खालील परीशीष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा करार विद्यमान मालक व आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर करारानुसार आमचे अशीलांनी व्यवहारापोटी विसार रक्कम साक्षीदारांसमक्ष विद्यमान मालकांना दिलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे, परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणुन विद्यमान मालकांच्या पुर्ण संमतीने या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालु वाद असल्यास अथवा सदर प्लॉट गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकुम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लिज, इजमेंट, अगर इतर कोणताही चालु वाद असल्यास हितसबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसांचे आत खालील पत्यावर समक्ष लेखी अथवा रजिष्टर्ड पोष्टाने योग्य त्या कागदपत्रांचे प्रमाणित नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. विहीत मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे समजुन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील, मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकत वर्णन**

जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, अहमदनगर महानगरपालीका हद्दीतील मे. सह. दुय्यम निबंधक अहमदनगर यांचे कार्यकक्षेतील शहरनगर येथील सारडा गल्ली भागातील बांधीव मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ चौरस मिटर |
|---|---|
| ३३२६ | १२३.७० |

यापैकी सुनिल शांतीलाल गुंदेचा यांचे १/३ हिश्याचे दक्षिण दिशेलगतचे क्षेत्र ४१.२३ चौ.मी. बांधकामासह खरेदी घेण्याचे ठरले आहे.

**सुनिल शांतीलाल गुंदेचा यांचे हिश्याच्या चतु: सिमा-**

पूर्वेस : सारडा लेन पांचलिंब गल्ली
दक्षिणेस : सि.स.नं. ३३२७ अ श्री. बोरा यांची मिळकत
पश्चिमेस : सि.स.नं. ३३२८/१ व ३३२५
उत्तरेस : सि.स.नं ३३२६ पैकी **सौ. सुनंदा रोहित भाटीया** यांची मिळकत

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक** -
**१) श्री. सुनिल शांतीलाल गुंदेचा**
रा. ३२१९, हलवाई गल्ली, अहमदनगर
**मान्यता देणार**
**सौ. सुनंदा रोहित भाटीया**
रा. २४, लालटाकी, अहमदनगर

**ॲड. महेश सुरेश जोशी**
तहसील कार्यालय समोर, सावेडी, ता नगर,
जिल्हा अहमदनगर ४१४००३



अहिल्यानगर फुटबॉल सुपरलीग स्पर्धेचे दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी खेळाडू, प्रमुख पाहुणे.

# मुला-मुलींनी मैदानी खेळाची आवड जोपासण्याची गरज

### नमिता फिरोदिया यांचे प्रतिपादन, अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग स्पर्धेचे उद्‌घाटन, नगर क्लबच्या मैदानावर दिवस-रात्र सामन्यांचा थरार

नगर – मुला-मुलींनी मैदानी खेळाची आवड जोपासण्याची गरज आहे. लहान मुलांमधून उत्कृष्ट फुटबॉल खेळाडू घडविण्यासाठी शहरात नमोह फुटबॉल क्लब कार्यरत आहे. विविध प्रशिक्षण शिबिर व स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंचा चालना देण्याचे कार्य सुरु आहे. स्पर्धेच्या माध्यमातून चांगले खेळाडू पुढे येत असून, त्यांना पुढे जाण्यासाठी पाठबळ दिले जात असल्याची माहिती नमिता फिरोदिया यांनी दिली.

नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने १५ वर्षा खालील शहरातील शंभर उत्कृष्ट खेळाडूंना स्पर्धेसाठी निवडण्यात आले. ८ संघ मालकांनी या खेळाडूंची आपल्या संघात निवड केली. या ८ संघात ही स्पर्धा सुरु असून, सकाळ व संध्याकाळच्या सत्रात फ्लड लाईटमध्ये फुटबॉल सामन्यांचे रंगातदार सामने होत आहे.

फुटबॉल खेळाला चालना व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने शहरातील नगर क्लबच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग स्पर्धेचे उद्‌घाटन ललिता प्रकाश फिरोदिया यांच्या हस्ते झाले. दिवस-रात्र रंगणाऱ्या लीग कम नॉकआऊट फुटबॉल सामन्यांच्या थराराचे प्रारंभ झाले आहे. या स्पर्धेचे हे तीसरे पर्व आहे.

नमोह फुटबॉलच्या नमिता फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झालेल्या फुटबॉल स्पर्धेच्या उद्धाटनाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संघ मालक दर्शन भंडारी (जीसी फायटर्स), सागर कायगावकर (एसजीके गोल्ड स्टार), जोएब खान (गुलमोहर चॅलेंजर्स), अभिनंदन भन्साळी (अवित्री वेलोसिटी किंग्स), प्रणिल मुनोत (कॉन्प्लेक्स सुपर हीरो), चेतन गांधी (गांधी वॉरीअर्स), ऋतविक वाबळे (आरडीएक्स ज्युनियर), आशिष तोट्टू (एक्सलन्स अचिव्हर्स) आदींसह खेळाडू उपस्थित होते.

उद्‌घाटनाच्या प्रारंभी खेळाडूंनी मैदानातून उत्कृष्ट संचलन केले. याप्रसंगी संघाचे प्रशिक्षक ऋषी पाटोळे, मयूर टेमक, प्रसाद पाटोळे, प्रणय रागिनवार, सिध्दार्थ चौहान, सौरभ चौहान, रोहन कुकरेजा, अक्षय बोऱ्हाडे आदी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सिध्दार्थ वांद्रे व ऋतिक चौहान परिश्रम घेत आहे. या स्पर्धे साठी खेळाडूंच्या किटचे प्रायोजकत्व केपीसी ज्वेलर्स यांनी स्विकारले आहे. तर स्पर्धेसाठी संघाचे प्रायोजकत्व गुलाबचंद कार्पेटवाला, एस.जी. कायगावकर, गुलमोहर स्पोर्टस क्लब, अवित्री बाईक्स, कॉन्प्लेक्स स्मार्ट थेटर, प्रॉस्पौरा, एजीडब्ल्यू ग्रुप, एक्सलन्स क्लासेस यांचे लाभले आहे. सह-प्रायोजक राम एजन्सी व फन की लॅण्ड हे आहे.

# बाल चित्रकला स्पर्धेत अपूर्वा नांदुरकर जिल्ह्यात प्रथम

नगर – कला संचालनालय मुंबई महाराष्ट्र राज्य व जिल्हा परिषद शिक्षण विभाग (माध्यमिक) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बाल चित्रकला स्पर्धेत अहिल्यानगर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी अपूर्वा सागर नांदुरकर जिल्ह्यात प्रथम आली आहे.




बालचित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभात अपूर्वा नांदुरकर हिला शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. (छाया – विजय मते)

नगर येथे अशोकभाऊ फिरोदिया विद्यालयात नुकतेच बाल चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. प्रथम क्रमांकाचे बक्षीस अपूर्वाला जिल्हा शिक्षण अधिकारी अशोक कडूस यांच्या हस्ते देऊन तिचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उपशिक्षणाधिकारी दरेकर, प्राचार्य प्रभाकर भाबड, शिक्षण विस्तार अधिकारी पवार, ढवळे, थोरात, चित्रकार अशोक डोळसे आदीं उपस्थित होते.

शिक्षण अधिकारी श्री. कडूस म्हणाले की पालक व कलाशिक्षक यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे. कलेची आवड असलेल्या मुलांना त्यामुळे प्रोत्साहन मिळते. भविष्यात अहिल्यानगर मधील चांगले कलाकार, चित्रकार घडलेले पहावयास मिळतील.

अपूर्वा नांदुरकर हिला यापूर्वी राष्ट्रीय, राज्यस्तरीय स्पर्धेत घवघवीत यश मिळालेले असून अनेक पारितोषिके मिळवलेली आहेत. तिला या स्पर्धेसाठी अशोक डोळसे, सुजाता पायमोडे, सचिन घोडेसर, अनामिका म्हस्के, गुंजाळ सर आदींचे मार्गदर्शन लाभले आहे.

